www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, ०१ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### २० अवैध फलकांचे पाडकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतले हाती

● पनवेल, भावना जैन :

पनवेल तालुक्यामधील कोन सावळा रस्त्यावर २० अवैध फलकांचे पाडकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने शुक्रवारपासून हाती घेतले आहे. तालुक्यातील कोन सावळा मार्गावरील फलक पाडण्यासाठी शुक्रवार ते पुढील आठवड्यापर्यंत जोरदार मोहीम राबविली जाणार आहे.

पनवेल तालुक्यामध्ये अनेक रस्त्यांवर खासगी जमिनी आणि सरकारी जमीनींवर अवैध फलक उभारले गेले आहेत. मागील अनेक वर्षे सरकारी जमीनींवर फलक उभारुन त्याचे भाडे घेणारी टोळी पनवेलमध्ये सक्रीय आहे. कोन सावळा रस्त्यालगत २० फलक काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मिलिंद कदम यांनी २ क्रेन यंत्र आणि १० मजूर घेऊन पाडकाम सुरू केले.

घाटकोपर येथील फलकाच्या दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्यावर का होईना मात्र सरकारी यंत्रणा पनवेलमध्ये अवैध फलकांविरोधात जोरदार मोहीम राबवित आहे. कोन सावळा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने सरकारी जमिनींवर हे अवैध फलक उभारल्याने अनेक वर्षांपासूनचे अवैध फलकांच्या माध्यमातून व्यवसायातून उत्पन्न कमविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## रक्ताचा नमुना घेण्यासाठी सहा तास, अमितेश कुमारांची बदली करा

### माजी IAS अधिकाऱ्याची महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे मागणी

● पुणे, अभिजित येरल्लू :



19 मे रोजी पोर्श दुर्घटनेप्रकरणी पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी एका माजी IAS अधिकारी यांनी महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे केली आहे. पोर्श दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला होता.

माजी आयएएस अधिकारी अरुण भाटिया यांनी महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षांना पत्र लिहिलंय आणि या पत्राद्वारे त्यांनी पत्राद्वारे बदली करण्याची मागणी केली आहे.

मी या प्रकरणात तुमचा (मानवी हक्क आयोगाचा) हस्तक्षेप मागतो कारण या प्रकरणाने आम्हाला हादरवून टाकले आहे आणि आमची असुरक्षितता वाढविली आहे आणि आम्हाला आमच्या प्रशासनाचा आणि लोकशाहीचा भयानक चेहरा दाखवला आहे.

पान २ वर

## मुंबईसह किनारपट्टी भागावर आर्द्रतेचं प्रमाण वाढणार

### 'या' मार्गानं मान्सून महाराष्ट्रात धडकणार

● मुंबई, यश सावंत :



दोन दिवसांपूर्वीच केरळमध्ये पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे आता मुंबईत पाऊस कधी येणार असा विचार मुंबईकरांच्या मनात येत आहे. हवेतील आर्द्रतेमुळे वातावरणात झपाट्याने बदल होत असून, त्यामुळे मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सामान्यतः मान्सून केरळमध्ये 1 जून रोजी पोहोचतो, परंतु यावेळी तो 30 मे रोजी दाखल झाला आहे. केरळमध्ये पोहोचल्यानंतर आता मान्सून कर्नाटक, रत्नागिरी, सिंधुदुर्गमार्गे गोव्यातून मुंबईत दाखल होणार आहे. हा प्रवास पूर्ण करण्यासाठी 10 दिवस लागतात. वाऱ्याचा वेग जसा बदलेल तसा मान्सूनचा वेगही बदलणार असल्याच हवामान खात्याने म्हटलं आहे. जर वेळे अगोदर पाऊस मुंबईत दाखल झाला तर भीषण गरमीपासून मुंबईकरांना दिलासा मिळेल. गुरुवारी मुंबईचे तापमान 35 डिग्री असल्याची नोंद झाली. तर आर्द्रता 80% ते 90% नोंदवली गेली. आर्द्रतेमुळे येत्या काही दिवसांत तापमान कमी राहणार असले तरी उष्णतेची लाट कायम राहणार आहे. हवेतील आर्द्रता हा मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणारा महत्त्वाचा घटक आहे.

IMD ने यापूर्वी 31 मे पर्यंत मान्सून केरळमध्ये पोहोचण्याचा अंदाज वर्तवला होता, परंतु चक्रीवादळ रेमलमुळे, मान्सून वेगाने पुढे गेला आहे आणि केरळ आणि ईशान्य भारताच्या बहुतेक भागात वेळेपूर्वी पोहोचला आहे.

पान २ वर

## पुण्यश्लोक "अहिल्यादेवींवर" नर्मदेचा जलाभिषेक

● ठाणे, सचिन कदम :

देशभरातल्या प्रमुख मंदिरांच्या जिर्णोद्धार करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची शुक्रवारी २९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धनगर प्रतिष्ठान व धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाच्यावतीने ठाण्यातील मासुंदा तलाव परिसरात असलेल्या अहिल्यादेवी यांच्या मूर्तीवर नर्मदेच्या जलाने अभिषेक करण्यात आला.

आहिल्यादेवी यांचे वंशज इंदोरच्या होळकर संस्थानचे श्रीमंत राजे यशवंतराव होळकर यांनी देशभरातील अहिल्यादेवी यांच्या प्रतिमांचे नर्मदेने जलाभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तीर्थ पाठविण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जंयतीनिमित्त महेश्वर राजगादी येथून देशभरातील अहिल्यादेवींच्या प्रतिमांचे नर्मदेच्या तिर्थाने अभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तीर्थ पाठविण्यात आले होते.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जंयतीनिमित्त महेश्वर राजगादी येथून देशभरातील अहिल्यादेवींच्या प्रतिमांचे नर्मदेच्या तिर्थाने अभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तिर्थ पाठविण्यात आले होते. राज्यात सांगली, पुणे,माळेगाव बारामती, पंढरपूर, चौंडी, ठाणे,औंढा नागनाथ, अंबड आदी ठिकाणी हे तीर्थ पोहचले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या दैनंदिन दिनश्चर्येत नर्मदा स्नानाचा उल्लेख सापडतो इतिहासातील हा सांस्कृतिक धागा पकडुन युवराज श्रीमंत यशवंतराव होळकर यांनी नर्मदा तिर्थ धनगर प्रतिष्ठान यांना पाठवले असून यंदाची जयंती वेगळ्या पद्धतीने साजरी झाली.

■ ठाण्यातील मासुंदा तलाव येथे आहिल्यादेवीच्या मूर्तीवर शुक्रवारी सकाळी भाजपाचे ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष डॉ राजेश मढवी व माजी नगरसेविका प्रतिभा राजेश मढवी यांच्या हस्ते नर्मदा तीर्थानने अभिषेक घालून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी ठाणे धनगर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे,धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाच्या अध्यक्षा माधवी बारगीर उपस्थित होत्या.तसेच ठाणे महापालिकेच्या वतीने सहाय्यक आयुक्त सोपान भाईक,वार्ड ऑफिसर आनंद पाटील,विकास मोरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

## एकाचवेळी ११२ महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसह पोलीस आयुक्तालयातून ९२ अधिकारी व कर्मचारी निवृत्त



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे महापालिकेतून सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या काही कमी होताना दिसत नाही. एप्रिल महिन्यात पालिकेच्या सेवेतून ३८ अधिकारी, कर्मचारी सेवा निवृत्त झाले असताना आता मे महिन्यात तब्बल ११२ अधिकारी, कर्मचारी सेवा निवृत्त झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

दुसरीकडे पोलीस सेवेतून देखील तब्बल ९२ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी शुक्रवारी सेवेतून निवृत्त झाले आहेत. महापालिकेत मात्र दरमहा सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढत असून त्यामुळे पालिका रिक्त होऊ लागली आहे. ठाणे महापालिकेच्या सेवेत २०१५ ते डिसेंबर २०२३ पर्यंत १५०० हून अधिक कर्मचारी, अधिकारी सेवा निवृत्त झाले आहेत. त्यात २०२४ सुरु होताच, पहिल्याच महिन्यात २७ कर्मचारी, अधिकारी हे सेवानिवृत्त झाले होते. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात त्यात आणखी २३ जणांची भर पडली. त्यानंतर एप्रिल महिन्यात तब्बल ३८ अधिकारी, कर्मचारी सेवा निवृत्त झाल्याची माहिती पालिकेने दिली. त्यानंतर आता मे महिन्यात तब्बल ११२ अधिकारी, कर्मचारी सेवेतून निवृत्त झाले आहेत. यात सफाई कर्मचारी ३१, शिक्षक १७, लिपिक ११, कार्यकारी अभियंता ०५, प्राध्यापक ०२, मुख्याध्यापक ०२ आणि बिगारी, टेक्निशिअन, वाहनचालक, माळी अशा ४४ जणांचा समावेश आहे. महापालिकेचा आकृती बंध मंजुर झाला असला तरी देखील त्याची भरती प्रक्रिया अद्यापही राबविली गेलेली दिसत नाही. नव्या वर्षात जानेवारी महिन्यात नव्याने सुमारे २५०० नवीन पदे भरली जाणार होती. परंतु आता मे महिना संपला तरी देखील ही पदे भरण्यासाठी महापालिकेला मुहुर्त सापडू शकलेला नाही. तर महापालिका शाळांतून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढत आहे. त्यातही मागील काही वर्षापासून एका एका शिक्षकावर अतिरिक्त कार्यभार दिला जात आहे. मुख्याध्यापकांची देखील पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. दुसरीकडे ३१ मे च्या दिवशी पोलीस विभागातील ९२ जण सेवा निवृत्त झाले आहेत. यात सहपोलीस आयुक्त गजानन काब्दुले यांच्यासह पोलीस निरिक्षक ०४, वरीष्ठ पोलीस निरिक्षक ०१, पोलीस उपनिरिक्षक ०७, स्वीस सहाय्यक -०१, श्रेणी पोलीस उपनिरिक्षक ३५, सह पोलीस निरिक्षक २६, पोलीस हवालदार १३, पोलीस नाईक ०२, शिपाई ९१, सफाई कामगार ०१ आदींचा त्यात समावेश आहे.

## "उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान करा, देशातील लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी!"- मनमोहन सिंग




● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

येत्या १ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदान पार पडणार. यामध्ये पंजाबमधील १३ जागांसह ८ राज्यातील एकूण ५७ जागांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, शेवटच्या टप्प्यातील मतदानापूर्वी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी जनतेला उद्देशून एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान करावे, असं आवाहन केलं आहे. तसेच लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे, असं म्हणत त्यांनी मोदी सरकारवर टीकाही केली आहे.

या पत्रात त्यांनी अर्थव्यवस्थेच्या मुद्यावरून मोदी सरकारवर टीकाही केली आहे. "नोटबंदीचा चुकीचा निर्णय, चुकीच्या पद्धतीने लागू करण्यात आलेला जीएसटी आणि करोना काळातील चुकीचं व्यवस्थापन यामुळे देशाची अर्थव्यवस्था कमजोर झाली आहे. भाजपा सरकारच्या काळात जीडीपीचा दर ६ टक्क्यांच्याही खाली गेला आहे. यूपीए सरकारच्या काळात हा दर ८ टक्के इतका होता. देशात बेरोजगारी आणि महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे", असे ते म्हणाले.

पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्गाची स्वप्नपूर्ती लांबणीवर; चिपळुणातील उड्डाणपूल पूर्ण करण्यास डिसेंबर २०२५ ची कालमर्यादा



● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

गेल्या अनेक महिन्यांपासून रखडेलल्या चिपळुणातील बहुचर्चित उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे. दोन रिग मशीनद्वारे पिलर उभारण्यासाठी उत्खनन केले जात असून, पुन्हा एकदा या कामाला वेग आला आहे.

सध्या उभारण्यात आलेल्या पिलरच्या मधे आणखी एक पिलर उभा करण्याचे नवे डिझाईन मंजूर झाले असून, या कामासाठी डिसेंबर २०२५ पर्यंतची कालमर्यादा देण्यात आली आहे. त्यामुळे महामार्ग पूर्ण होण्यासाठी आता आणखी दीड वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.

■ उड्डाणपुलाचे काम ईगल कंपनीच करत आहे. केवळ ठेकेदार बदलला आहे. नव्या डिझाईनप्रमाणे काम सुरू झाले असून कोणत्याही परिस्थितीत डिसेंबर २०२५ पर्यंत हे काम मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील. उड्डाणपुल कोसळल्यानंतर तयार केलेले पहिले गर्डर आणि पॅन नष्ट करावे लागल्याने ठेकेदाराचेही मोठे नुकसान झाले. आता शासनाकडून उड्डाणपुलासाठी नव्याने वाढीव खर्च केला जाणार आहे. - आर. पी. कुलकर्णी, जिल्हा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला आतापर्यंत तीनवेळा मुदतवाढ देण्यात आली परंतु तोही कालावधी आता कमी पडू लागला आहे. चिपळूणच्या सर्वाधिक १८०० मीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे काम बराच काळ रखडले आहे. या पुलाच्या कामाला डिसेंबर २०२३ पर्यंत अंतिम मुदत होती. परंतु ऑक्टोबर २०२३ मध्ये काम सुरू असतानाच पुलाचा काही भाग कोसळला. शहरातील बहादूर शेखनाका येथे ही घटना घडली होती. त्यानंतर पुलाचे काम थांबविण्यात आले होते.

पान २ वर

## नंदुरबार जिल्हा परिषदेतील ७२ जणांविरुध्द कारवाई, कथीत अपंग युनिट घोटाळा

● नंदुरबार, नितीन देवळेकर :

जिल्हा परिषदेतील कथीत अपंग युनिट घोटाळयाप्रकरणी ७२ जणांविरुध्द कारवाईचा बडगा उगारण्यात आला असून त्यांच्या सेवा समाप्तीच्या आदेशाने खळबळ उडाली आहे. विशेष चौकशी पथकाने (एसआयटी) अहवालात या ७२ जणांचे समावेशन हे शासनाच्या २०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे झाले नसल्याचा निष्कर्ष काढला असून संबंधितांची नावे देखील शासनाकडील अपंग युनिटवरील विशेष शिक्षकांच्या मूळ यादीत



समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले आहे.

केंद्र पुरस्कृत अपंग एकात्मिक योजनेतील विशेष शिक्षक, परिचर योजना एक मार्च २००९ पासून बंद झाल्याने सदर योजनेवर कार्यरत असलेल्या विशेष शिक्षक, परिचर यांचे समायोजन करण्यासाठी उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक या रिक्त पदावर सामावून घेण्यास मान्यता देण्यात आली होती. यासाठी शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०१० च्या सूचनांनुसार समायोजन करण्याचे नमूद करण्यात आले होते. असे असतांना २०१७ मध्ये नंदुरबार जिल्हा परिषदेत अपंग युनिटमध्ये अनेक शिक्षक कर्मचाऱ्यांची नियमबाह्य भरती झाल्याचा आरोप झाला होता.


■ अपंग युनिट भरती प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकाने ७२ जणांचे समायोजन शासन निर्णयाप्रमाणे झाले नसल्याचा अहवाल दिला आहे. त्यानुसार पडताळणी करून ७२ जणांच्या सेवा समाप्तीचे आदेश दिले आहेत. यात आणखी आठ जणांची चौकशी सुरू आहे. याबाबत चार ते पाच दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

-सावनकुमार ( मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार)

पान २ वर

## मुंबईत शनिवारी 'जम्बो' हाल होणार; ५३४ लोकल फेऱ्या रद्द !

● मुंबई, विशाल पाटील :



ठाणे येथील फलाटांच्या विस्तारीकरणासाठी गुरुवारी रात्री १२.३० वाजता सुरु झालेल्या ब्लॉकने मुंबईकरांचा घाम काढला असतानाच आता शनिवारी मध्य रेल्वे मार्गावर ५३४ लोकल फे-या रद्द करत रविवारच्या वेळापत्रकाप्रमाणे लोकल गाड्या चालविण्यात येणार आहेत. त्यामुळे शुक्रवारच्या तुलनेत शनिवारी मुंबईकरांचा लोकल प्रवास यातनादायक होणार असून, मुंबईकरांचे लोकलहाल कायम राहणार आहेत.

मध्य रेल्वेच्या वतीने ठाणे येथील फलाटांच्या विस्तारीकरणासाठी हाती घेतलेला ब्लॉक रविवारी दुपारी १२.३० पर्यंत आहे. तर सीएसएमटी येथील फलाटांच्या विस्तारीकरणासाठी शुक्रवारी रात्री १२.३० वाजता सुरु होणारा ब्लॉक रविवारी दुपारी १२.३० पर्यंत चालणार आहे.


पान २ वर

## संपादकीय

# अपघात, अव्यवस्था आणि अस्वस्थता

'भरधाव आलिशान मोटारीच्या धडकेत मोटरसायकलवरून निघालेले दोघे जण ठार' ही बातमी परवा कळल्यापासून पुणेकर अस्वस्थ आहेत. एक अल्पवयीन मुलगा वडलांची अजूनही नोंदणी न झालेली आलिशान मोटार घेऊन 'पार्टी' करायला बाहेर पडतो काय, 'पार्टी' झाल्यावर १६० किलोमीटर प्रतितास वेगाने गाडी चालवतो काय, वेगामुळे नियंत्रण सुटून रस्त्यावरून चाललेल्या दुचाकीला उडवतो काय आणि त्या धडकेने दुचाकीवरील दोघे जण हवेत फेकले जाऊन मग जमिनीवर जोरात आपटल्याने मृत्युमुखी पडतात काय ! सुन्न करणारा हा प्रकार ज्या कल्याणीनगर, T! कोरेगाव पार्क परिसरात झाला, तेथे अनेक पब, रेस्टॉरंट आहेत. विशेषतः शनिवारी रात्री तेथे तरुणाईची अलोट गर्दी असते. ही 'पार्टी' प्रेमी तरुणाई 'पार्टी' करून बाहेर पडल्यानंतर मात्र अनेकदा इतकी बेधुंद होते, की आपल्यामुळे आजूबाजूच्यांना त्रास होत असेल वगैरे जाणवण्याइतपत ते भानावरच नसतात. ज्या तरुण लोकसंख्येच्या लाभांशाची 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' वगैरे म्हणून आपण चर्चा करतो, त्या पिढीचे हे सुटलेले भान रस्तोरस्ती आपल्या बेमुर्वतखोर वर्तनाने उच्छाद मांडते आहे. कल्याणीनगरमध्ये घडलेला प्रकार यातीलच. यातील आरोपींना शिक्षा देण्याचे काम न्यायव्यवस्थेचे आणि त्यांना योग्य शिक्षा मिळेल, यासाठी योग्य पद्धतीने तपास करण्याचे काम पोलिसांचे आहे. मात्र, यानिमित्ताने एकूणच व्यवस्थेसमोर जे प्रश्न उभे ठाकले आहेत, त्यांची चर्चा करणे नितांत गरजेचे आहे. जेथे अपघात झाला, त्या परिसरातील रहिवासी, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आदींनी आंदोलने केली, मागण्या केल्या आणि अनेक प्रश्नही उपस्थित केले. त्यांची तड लावताना आपल्याला आणखी एका व्यापक प्रश्नाचे उत्तर शोधावे लागणार आहे, तो म्हणजे नियोजनबद्ध विस्ताराऐवजी सुजल्यासारखी वाढणारी शहरे खरेच व्यवस्थेच्या नियंत्रणात राहिली आहेत का? उदाहरणादाखल व्यवस्थेच्या नियंत्रणाचा या घटनेच्या अंगाने विचार करायचा, तर पुणे शहरात एकूण किती पब आहेत, हे कोणत्याच संबंधित यंत्रणेला माहीत नाही, अशी आजची स्थिती आहे. असे असेल, तर तेथे अल्पवयीनांना मद्य मिळणार नाही, ती दिलेल्या वेळेपेक्षा अधिक काळ सुरू राहणार नाहीत, तेथे अवैध धंदे चालणार नाहीत आदी अपेक्षा व्यवस्थेकडून सामान्य माणूस करू शकेल का? बरे, त्यातून अपघातासारखी स्थिती उद्भवली, तर अपघात करणारा कुणा तरी बड्या बापाचा बेटा आहे, म्हणून त्याला व्यवस्थेकडूनच नियमांतील शक्य तेवढ्या पळवाटा शोधून दिले जाणारे 'संरक्षण' आणि बळी गेलेल्या सामान्यांकडे मात्र दुर्लक्ष, हेच वाट्याला येणार का ? नियोजनबद्ध विस्तारात सामाजिक अनारोग्यावर उपाय तरी शोधता येतात, सूज असेल, तर मात्र ती ठुसठुसतच राहते. अशा सामाजिक अनारोग्यावर मोठी शस्त्रक्रियाच करावी लागते. पुण्यासारख्या शहरात सामाजिक संघटना आणि नागरिकांचा दबावगट अद्याप कार्यरत आहे म्हणून व्यवस्थेला त्याची दखल तरी घ्यावी लागते, हे त्यातल्या त्यात सुदृढ लक्षण. अर्थात, ही सुदृढता अधोरेखित करताना ती व्यापक असावी, अशी अपेक्षाही गैरलागू नाही. म्हणूनच, या घटनेच्या निमित्ताने एकदा समाज म्हणून आपल्या वर्तनाचेही अवलोकन करणे गरजेचे आहे.

घडलेल्या अपघाताची आणि मोडलेल्या नियमांची चर्चा करताना, सामान्यजनही आपापल्या पातळीवर नियमांची किती पायमल्ली करत असतात आणि नियम मोडण्याचे हे सार्वत्रिक आकर्षण कोठून येते, हेही पाहिले पाहिजे. बेदरकारपणे वाहने चालवणे किमान पुण्यात तरी आता सर्रास झाले आहे. सिग्नल मोडणे, दुचाकीवरून तिघातिघांनी प्रवास करणे, हेल्मेट न वापरणे आणि त्याचे समर्थन करणे, 'नो एंट्री'तून येणे, 'रॉंग साइड'ने जाणे, नियम पाळणाऱ्यांवरच अरेरावी करणे हे समाजाच्या अनारोग्याचेच लक्षण असते. ही नोंद महत्त्वाची अशासाठी, की समाजमाध्यमांतून या घटनेबद्दल रोष व्यक्त होताना, 'पुण्याची संस्कृती रसातळाला जाते आहे,' अशी ओरड होत आहे. काही जणांसाठी ती सोयीची असली, तरी शहरात नियमपालनाची संस्कृतीही महत्त्वाची आहे, मग ती पब किती वेळ चालू ठेवायचे, याबद्दल असो वा वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत. शहराची वाढ होत असताना, त्यात अनेकविध प्रकारची लोकसंख्या सामावून घेतली जात असताना, पूर्वीच्या एका विशिष्टच संस्कृतीचा आग्रह धरत बसणे अव्यवहार्य शहर विस्ताराच्या प्रक्रियेमध्ये केवळ इमारती वाढून चालत नाहीत, तर सांस्कृतिक घुसळण आणि नंतर त्या मंथनातून नवोन्मेषाच्या शक्यता असाच प्रवास व्हावा लागतो. शहराच्या गरजा वाढतात, तसे त्या भागवणाऱ्या सेवांचाही विस्तार होणार. त्यांना घातलेल्या नियमांचे कुंपणच व्यवस्था खात नाहीत ना आणि त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपलाही सहभाग नाही ना, याची पडताळणी करत राहणे महत्त्वाचे.



### आजची चित्रोळी

गंधासंगे रंग मिसळला  
जलांत ऋतू वसंतानें !  
वेड मनांला पाहून लागें  
निसर्गाच्या मोहानें !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### मुंबईसह किनारपट्टी भागावर आर्द्रतेचं

यंदाच्या पावसाळ्यात सामान्य पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. 'मान्सूनचा पॅटर्न कधीच सारखा नसतो', अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे प्रादेशिक उपमहासंचालक सुनील कांबळे यांनी दिली. पुढे ते म्हणाले की, मान्सूनचा पॅटर्न दरवर्षी सारखा नसतो. पर्यावरणीय परिस्थितीनुसार ते बदलते. केरळमध्ये ज्याप्रमाणे मान्सून वेळेआधी दाखल झाला आहे, त्याचप्रमाणे मुंबईतही मान्सून निर्धारित वेळेपूर्वी दाखल होऊ शकतो.

येत्या दोन-तीन दिवसांत दक्षिण-पश्चिम मान्सूनचा आणखी विस्तार होण्यास अनुकूल परिस्थिती असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. या भागात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.

- मध्य अरबी समुद्राचे इतर काही भाग.
- दक्षिण अरबी समुद्राचे उर्वरित भाग.
- लक्षद्वीप प्रदेश आणि केरळचा काही भाग.
- कर्नाटकातील काही भाग.
- तामिळनाडूचे इतर काही भाग.
- दक्षिण-पश्चिम आणि मध्य बंगालचा उपसागर.
- ईशान्य बंगालच्या उपसागरातील उर्वरित भाग.
- आसाम आणि मेघालय.
- पश्चिम बंगाल आणि सिक्कीमचे उप-हिमालयी भाग.

आठवड्याच्या उर्वरित दिवसांमध्ये, नैऋत्य मान्सून दक्षिण भारताच्या उर्वरित भागांमध्ये आणि पूर्व भारतातील आणखी काही भागात पसरू शकतो.

### मुंबई-गोवा महामार्गाची स्वप्नपूर्ती ...

उड्डाणपुलाच्या पहिल्या डिझाईननुसार ४० मीटरवर पिलर उभारण्यात आले होते. पिलरचे काम अंतिम टप्प्यात होते तसेच त्यासाठी लागणारे गर्डर ही पूर्णतः तयार झाले होते. अशातच दुर्घटना घडली आणि या उड्डाणपुलाचे काम थांबले. मात्र, बहादूरशेखनाका येथे वळणावरून हा पूल जात असल्याने डिझाईनमध्ये बदल करण्यात आला. नव्या डिझाईनला तब्बल सहा सात महिन्यांनंतर मंजुरी मिळाली. नव्या डिझाईननुसार दोन पिलरमधील गाळ्याचे अंतर २० मीटर राहणार आहे. प्रत्येक २० मीटरवर एक पिलर उभारण्यात येणार आहे.

काही दिवसांपूर्वीच या उड्डाणपुलासाठी नव्याने पिलर उभारणी करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी अतिथी हॉटेलच्या समोर खोदाईला सुरुवातही झाली. दोन रिग मशीन आणून उत्खनन सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी शक्य तेवढ्या खोदाईवर भर दिला जाणार आहे. उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेले गर्डर पुन्हा नव्याने केले जाणार असून त्यासाठी कळंबस्ते येथे प्लँट उभारण्यात आला आहे. पिलरवर गर्डर टाकल्यानंतर त्यावर काँक्रिटचा स्लॅब टाकून उड्डाणपुलाची उभारणी केली जाणार आहे. पहिल्या डिझाईननुसार दोन पिलरमधील अंतर ४० मीटर होते. मात्र, आता २० मीटरवर पिलर उभारले जात असल्याने गर्डरचेही त्याच पद्धतीने काम केले जाणार आहे.

### "उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान...

मनमोहन सिंग यांनी या पत्राद्वारे शेतकऱ्यांच्या मुद्यावरून मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. "काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी कृषी कायद्याविरोधात आंदोलन केल होते. यात जवळपास ७५० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. यापैकी अनेक जण पंजाब आणि शेजारच्या राज्यातील होते. निर्दयी मोदी सरकारने आपल्या शेतकऱ्यांवर लाठीचार्ज केला. तसेच त्यांच्यावर अश्रूगोळे फेकले. पंतप्रधान मोदी यांनी २०२२ साली शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते. परंतू तसे झाले नाही. याउलट गेल्या १० वर्षातील चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले", असे ते म्हणाले.

अग्नीवीर योजनेवरूनही केलं लक्ष्य

पुढे या पत्रात त्यांनी अग्नीवीर योजनेवरूनही मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. "मोदी सरकारने सशस्त्र दलांसाठी अग्नीवीर योजना आणली. भाजपाला वाटते की देशभक्तीचं मुल्य केवळ ४ वर्ष आहे. यावरून भाजपा मनातील पोकळ देशभक्ती दिसून येते", अशी टीका त्यांनी केली.

### नंदुरबार जिल्हा परिषदेतील ७२ ...

हा सर्व घोटाळा २०१८ मध्ये उघड झाल्यानंतर त्यावर्षी पावसाळी अधिवेशनात चौकशीसाठी खास विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली होती.

या पथकाने आपल्या चौकशी अहवालात जिल्हा परिषदेचे ६० शिक्षक आणि १२ परिचर यांचे समायोजन नियमबाह्य झाल्याचे निदर्शनास आले आहे. शासन निर्णय १५ सप्टेंबर २०१० च्या सूचनांनुसार या सर्वांचे समायोजन झालेले नाही. ही अनियमितता असल्याचा ठपका पथकाने ठेवला. या ७२ जणांनी आपल्या समायोजनासाठी जिल्हा परिषदेकडे सादर केलेले प्रस्ताव शासन पत्र व्यतिरिक्त असल्याचे विशेष चौकशी पथकाचे अहवालावरुन निर्देशनास आले आहे. तसेच प्रस्तावाबरोबर युनिट मान्यता आदेश, वैयक्तीक मान्यता आदेश यांची तपासणी पथकाने केली असता प्राप्त चौकशी अहवालानुसार संबधीतांचे नाव शासनाकडील अपंग युनिटवरील विशेष शिक्षकांच्या मूळ यादीत समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे या ७२ जणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊन खुलासा मागविण्यात आला होता. त्यांच्याकडून प्राप्त खुलासा समाधानकारक नसल्याने व संबंधीतांची नियुक्ती शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१० च्या सूचनांनुसार झालेली नसल्याने संबंधीतांचा खुलासा अमान्य करण्यात आला. याच अनुषंगाने २४ मे रोजी विभागीय आयुक्तांनी या सर्वांवर कारवाईचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यासंदर्भात जिल्हा परिषदेमधील वर्ग चार म्हणून कार्यरत असलेले १२ परिचर आणि ६० प्राथमिक शिक्षकांना सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात आले आहेत. या ६० पैकी सहा शिक्षकांची जळगाव मध्ये आंतरजिल्हा बदली झाली असल्याने त्यांच्या सेवा समाप्तीच्या आदेशाबाबत जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

### मुंबईत शनिवारी 'जम्बो' हाल होणार; ५३४...

या ब्लॉकसाठी शनिवारी ५३४ तर रविवारी २३५ लोकल रद्द करण्यात आल्या आहेत. शनिवारी ३७ तर रविवारी ३१ मेल/एक्सप्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. सीएसएमटी येथील ब्लॉकमुळे लोकल हार्बर मार्गावर वडाळयापर्यंत तर मुख्य लाईनवर भायखळयापर्यंत चालविण्यात येणार आहे. तिन्ही दिवसांच्या ब्लॉकमुळे एकूण ९३० लोकल फे-या रद्द करण्यात आल्या असून, शनिवारी सर्वाधिक म्हणजे ५२४ लोकल फे-या रद्द करण्यात आल्या आहेत.

मुंबईकरांनी महत्त्वाच्या कामाशिवाय लोकलने प्रवास करू नये, असे आवाहन मध्य रेल्वेच्या प्रवाशांना करण्यात आले आहे. शिवाय बहुतांशी कार्यालयांनी आपल्या कर्मचा-यांना वर्क फ्रॉम होम करण्याची परवानगी द्यावी, असे विनंतीही रेल्वेच्या वतीने कार्यालयांना करण्यात आली आहे.

### रक्ताचा नमुना घेण्यासाठी सहा तास,...

भ्रष्ट अधिकारी आणि त्रस्त नागरिक आता दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. भाटिया यांनी हे पत्र पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच लोकायुक्त, मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाला पाठवले आहे. भाटिया यांनी पुणे पोलिस आयुक्तांना अपयशी पोलीस आयुक्तदेखील म्हटलं आहे.

पुण्यातील सर्वात मोठ्या सरकारी रुग्णालयाच्या (ससून) मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांसह पोलिस अधिकारी आणि वरिष्ठ डॉक्टरांनी संगनमत करून एका गुन्हेगाराला वाचवले, असा दावा निवृत्त आयएएस अधिकाऱ्यांनी केला आहे. आरोपीने मद्यपान केले की नाही हे तपासण्यासाठी रक्ताचे नमुने पाठविण्यास पोलिसांना सहा तासांहून अधिक वेळ लागला. इतकंच नाही तर रक्त तपासणीपूर्वी पोलिसांनी त्याला पोलीस स्टेशनमध्ये पिझ्झा खायला दिला, मग डॉक्टरांनी सॅम्पल नष्ट केला, असंही त्यांनी या पत्रात लिहिलं आहे.पोलिस आयुक्त हे शहरातील पोलिस दलाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने निष्पक्ष चौकशीसाठी त्यांची तातडीने पुण्याबाहेर बदली करून त्यांच्या वर्तनाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भाटिया यांनी केली. एकापाठोपाठ एक धक्कादायक खुलासे झाल्याने राज्याने राजकारण तापले आहे.

19 मे च्या रात्री भीषण अपघातात दोन अभियंत्यांचा मृत्यू झाल्यानंतर आरोपी अल्पवयीन मुलाला वाचविण्यात पोलिसांसह डॉक्टरांचे कारनामे बाहेर आले आहेत. त्यामुळे थेट आयुक्तांची बदली व्हावी, अशी मागणी केली आहे.

पुण्यातील पोर्शे कार प्रकरणात आतापर्यंत पुणे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. ते धिम्या गतीने तपास करत असल्याचा आरोप त्यांच्यावर विविध स्तरावरुन होत आहे. त्यामुळे रवींद्र धंगेकरांनीदेखील अमितेश कुमार यांना निलंबित करूण्याची मागणी केली होती.

# मनस्पर्शी परिवाराचे दैदीप्यमान कवी संमेलन



डॉ. निलांबरी गानू यांनी केलेल्या कार्याची दखल नासाने सुद्धा घेतलेली आहे. त्यांच्या नावाचे पोस्टाचे तिकीट सुद्धा प्रसिद्ध झालेले आहे. अहिल्याबाई होळकरांवर लिहिलेली त्यांची कादंबरी जगप्रसिद्ध आहे.त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेले मनस्पर्शी साहित्य परिवाराचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र येथे उत्साहात झाले. संमेलनाध्यक्ष - चंद्रकांत दादा वानखेडे (ज्येष्ठ साहित्यिक), उद्घाटक बबन धुमाळ (प्रसिद्ध गझलकार), प्रमुख अतिथी रवींद्र यशवंतराव देशमुख (प्रसिद्ध गझलकार व वास्तुशास्त्रज्ञ), स्वागताध्यक्ष - प्रा.विजय काकडे ('वास्तवातील कथा फेम' लेखक), उत्सवमूर्ती - डॉ. निलांबरी गानू (कादंबरीकार) या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सोहळा हे संमेलन झाले. हसीमा प्रसादे, आद्या देशपांडे व सोनाली जगताप यांनी संमेलन यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ, भरजरी शेला, आणि सन्मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्दिष्ट आणि समूहाची प्रस्तावना आपल्या सुंदरशैलीत समूहाच्या अध्यक्षा मानसी पंडित यांनी सर्वांसमोर प्रस्तुत केली. बबन धुमाळ यांनी उद्घाटन सोहळा संपन्न झाला असे घोषित करून आपल्या बहारदार आणि अभ्यासपूर्ण मनोगताने कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यांनी सादर केलेल्या गझलेने सर्वांची मने जिंकून घेतली. प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले रवींद्र यशवंतराव देशमुख यांनी आपल्या मनोगतात साहित्याप्रती असलेली सद्भावना आणि पुढे नेण्याची जिद्द व्यक्त केली.

मनस्पर्शी परिवाराच्या समन्वयक व संमेलनाच्या उत्सव मूर्ती डॉ. निलांबरी गानू यांनी केलेल्या कार्याची दखल नासाने सुद्धा घेतलेली आहे. त्यांच्या नावाचे पोस्टाचे तिकीट सुद्धा प्रसिद्ध झालेले आहे. अहिल्याबाई होळकरांवर लिहिलेली त्यांची कादंबरी जगप्रसिद्ध आहे. उत्सव मूर्तींनी सर्व साहित्यिकांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. तसेच मनस्पर्शी परिवाराबद्दल असलेले स्नेह आपल्या साश्रू नयनांनी व्यक्त केले. त्यांची बहारदार लावणी सर्वांना तालावर नाचायला उत्स्फूर्त करत होती. स्वागताध्यक्ष श्री विजय काकडे यांनी त्यांची "आव्हान देत जाणार काल मीच होतो " ही बहारदार गझल आपल्या सुरेल आवाजात सादर करून मैफालीत रंगत आणली तसेच कथा आणि कथेचे महत्व सर्वांना पटवून दिले व निखिल कोलते यांच्या पुस्तकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी मनस्पर्शी परिवाराच्या सर्व प्रशासकांच्या कार्याची प्रशंसा मुक्तकंठाने केली. निखिल कोलते यांच्या कथासंग्रहाला विजय काकडे सरांचीच सुंदर व सखोल प्रस्तावना लाभलेली आहे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

साहित्य क्षेत्रातील ' बाप माणूस 'तसेच या संमेलनाला लाभलेले अध्यक्ष श्री.चंद्रकांतदादा वानखेडे यांनी आपल्या ठसकेबाज आवाजात भाषणाला सुरुवात केली. त्यांच्या भाषणातील प्रत्येक शब्द हा सहजरीत्या प्रत्येक साहित्यिकाच्या काळजात उतरत होता. त्यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांचा साहित्याशी असलेला संबंध आणि इतिहास सर्वांसमोर स्पष्टपणे मांडला. ऐकणाऱ्या प्रत्येक श्रोतावर्गाला आणि साहित्यिकाला त्यांची भाषण शैली आणि झुंजार व्यक्तिमत्व टाळ्यांचा गडगडाट करायला प्रवृत्त करीत होते.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात कु. निखिल प्रमोद कोलते यांच्या "मनातलं न्यायालय" या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच कवी राजेश नागुलवार उर्फ राजमन रा. चंद्रपूर यांच्या "मनभावन प्रभात" या चित्र चारोळी संग्रहाचे सुद्धा प्रकाशन या सोहळयात करण्यात आले

मा. मानसी पंडित,मा. सोनाली जगताप, मा जयश्री शेळके, मा. सौ.संपदा देशपांडे यांनी कथासंग्रह आणि चारोळी संग्रहबाबत आपले मनोगत व्यक्त केले. तसेच समुहाच्या उज्वल वाटचालीसाठी योग्य मार्गदर्शन केले.

निखिल कोलते यांच्या भगिनी तसेच मनस्पर्शी साहित्य परिवाराच्या अध्यक्षा कु. मानसी ताई पंडित यांनी एक सुंदर शुभेच्छापत्र सादर केले होते.

निखिलच्या आई यांनीही या पुस्तकासाठी निखिल ची मेहनत, आजवरच्या संघर्षाचे वर्णन आपल्या शब्दांत केले.

त्यानंतर एकामागून एक कवींच्या सादरीकरणाला सुरुवात झाली. प्रत्येक साहित्यिकांच्या कवितेत इतका जोश आणि स्फूर्ती भरलेली होती की श्रोतावर्ग हा मंत्रमुग्ध होऊन गेला. सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात कवयित्री राजश्री सोले, मीना राजपूत, जयश्री चौधरी, शुभा खांबेकर पाणसरे, विवेक जोशी, रविंद्र गाडगीळ, मंजुषा चिटटवार, भाग्यश्री खुटाळे, पुरुषोत्तम इंगळे, रीमा गुमास्ते या कवी कवयित्रींचे सादरीकरण घेण्यात आले. मंजुषा चिटटवार यांनी उत्सवमूर्ती निलांबरी गानू यांच्यावर कविता सादर करून त्यांना भावूक करून टाकले. कवी पुरुषोत्तम इंगळे यांनी कट्ट्यावर मित्रांसोबत सिगरेट पिणाऱ्या मुलीची अवस्था आपल्या कवितेतून व्यक्त केली.

कविता सादरीकरणाच्या दुसऱ्या सत्रात कवी साजन पिलाणे, प्रांजली हारकूड, सरोज करंदीकर भिडे, योगिता तकतराव, ऋचा पत्की, अर्चना मानकर, नागोराव सोनकुसरे, उमाकांत आदमाने, अरुण पुराणिक, सुभाष कटकदौंड, सौ. प्रतिभा कुलकर्णी, मानसी पाटिल, अंबादास ठाकूर, ऋचा पारेख, सरोज शेवडे, आदिती पटवर्धन, शिल्पा चऱ्हाटे, रचना वासेकर, मधुरा कर्वे, वनिता पाटील, सुभाष मोहनदास, मोहन जुंदळे गुरूजी, पंडित वराडे, सुमित हजारे, गिरीश वसेकर, रामचंद्र खाडे, अद्विता पुष्कराज कुलकर्णी (७ वर्षे), पुष्पा सदाकाळ, विणा व्होरा, अनघा गुप्ते, श्यामल पाटील, दिपाली घाडगे असे एकामागे एक सर्व साहित्यिकांचे सादरीकरण झाले. गझलकार सुभाष कटकदौंड यांनी 'बायको' या शीर्षकाच्या अंतर्गत घेतलेली कविता प्रत्येकाच्या मनातील बायकोचे प्रतिबिंब समोर दर्शवत होती. कवयित्री सुनिषा कुलकर्णी यांची नात केवळ सात वर्षे वयाची कु.अद्विता पुष्कराज कुलकर्णी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. तिने सायंटिस्टवर आधारित सादर केलेली कविता सर्वांना साहित्याच्या भविष्याबाबत निश्चिंत करीत होती. कवयित्री वीणा व्होरा यांनी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर घातल्या गेलेला पुरुषत्त्वाचा व अहंकाराचा धोंडा सर्वांसमोर फोडून काढला. मनस्पर्शी परिवाराच्या वर्षभरात घेण्यात आलेल्या साप्ताहिक व मासिक उपक्रमाच्या विजेत्यांचा गद्य तसेच पद्य विभागातील पुरस्कार वितरण सोहळा सुद्धा या संमेलनात घेण्यात आला. या सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सौ. वनिता पाटील, अंजना कर्णिक, किरण वेताळ, मनिषा पाटील, डॉ. सुभाष कटकदौंड, सौ. वीणा व्होरा, सौ. योगिता तकतराव, सौ. सुनिता कपाळे, रिया पवार, विजया भांगे, जयश्री चौधरी, सरोज शेवडे, श्यामल पाटील-अग्रवाल, स्मिता उधळीकर, सीमा रिसबूड, रिमा गुमास्ते याप्रमाणे सर्वांना विजेते होण्याचा आनंद अनुभवायला मिळाला.

समूहाचे संस्थापक निखिल कोलते व अध्यक्षा मानसी पंडित यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपाध्यक्षा जयश्री शेळके व सहसंचालिका सौ संपदा देशपांडे यांनी उत्तमरीत्या निवेदन करून कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचा हातभार लावला. कार्यकारिणी सदस्य किरण वेताळ यांनी संमेलन यशस्वी करण्यात महत्वाची भूमिका बजावली. मानसी पंडित, निखिल कोलते यांचे, जयश्री शेळके यांचे कुटुंबीय सुद्धा या प्रसंगी उपस्थित होते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाण्यात अवैध व्यवसायांना आश्रय देणाऱ्या पोलिसांवर होणार कारवाई

## बेकायदा पब, हुक्का पार्लर, डान्स बारवर कारवाईसाठी स्वतंत्र कक्ष



● ठाणे : पुणे येथील पोर्श अपघाताप्रकरणानंतर जाग आलेल्या ठाणे उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात बेकायदा सुरू असलेल्या ११ हॉटेल आणि बारचे परवाने निलंबित केले असतानाच, त्यापाठोपाठ आता ठाणे पोलिसांनी बेकायदा पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारवर कारवाईसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे. तसेच अशा अवैध व्यवसायांना आश्रय देणाऱ्या स्थानिक पोलिसांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिला आहे.

ठाण्यातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारवर कारवाई व्हावी अशी मागणी भाजपचे आमदार संजय केळकर यांनी यापुर्वीच ठाणे पोलिसांकडे केली होती. परंतु त्यावर अपेक्षित कारवाई होत नसल्याबद्दल केळकर यांनी नाराजी व्यक्त केली होती. पुणे येथील पोर्श अपघाताप्रकरणानंतर ठाण्यातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार केळकर यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांची भेट घेऊन अशा व्यवसायांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली.

गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून ठाण्यातील तरुण पिढ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या बेकायदेशीर डान्स बार, पब आणि हुक्का पार्लर या अवैध व्यवसायांविरुद्ध महापालिका आणि पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा करीत असून यासंदर्भात लोक चळवळही सुरू केली. यावर अधिवेशनातही आवाज उठवला. यानंतर ठाण्यातील या अवैध व्यवसायांवर कारवाई झाली. पण, त्यांनतर पुन्हा हे व्यवसाय सुरू होत असल्याची बाब आमदार केळकर यांनी आयुक्त डुंबरे यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच या अशा व्यवसायांवर ठोस कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

■ अवैध व्यवसायांवर नियमित आणि ठोस कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात आला असल्याची माहिती आयुक्त डुंबरे यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर अशा अवैध व्यवसायांना त्या-त्या विभागातील स्थानिक पोलीस ठाणे जबाबदार राहणार असल्याचे सांगून त्यासाठी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त डुंबरे यांनी यावेळी दिल्याचे केळकर यांनी सांगितले. या संदर्भात ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

■ ठाण्यातील तरुण पिढी उद्ध्वस्त होऊ नये यासाठी या अवैध व्यवसायांविरुद्ध लोकचळवळ सुरू केली आहे. त्याला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. मागील काळात काही पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबत गांभीर्याने काम केले, परंतु काही ठिकाणी दुर्लक्ष झाले. त्यामुळे यावर ठोस कारवाई करण्यासाठी पोलिस आयुक्तांना भेटून अनेक मागण्या केल्या. त्या मान्य करून त्याची अंमलबजावणी तातडीने करणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

**- संजय केळकर (आमदार, ठाणे शहर)**

## रायते गावात समाज कल्याण अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेतून सरपंच समिता सुरोशी यांच्या हस्ते रस्त्याचे भूमिपूजन !



●मुरबाड - कल्याण तालुक्यातील रायते गावात समाज कल्याण अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेतून येथे या गावच्या सरपंच समीता सुरोशी यांच्या हस्ते रस्त्याचे श्रीफळ वाढून भूमिपूजन करण्यात आले.

या रस्त्याला दहा लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे .१३३ मीटर अंतर असलेला हा रस्ता आहे .भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२/२०२३ अंतर्गत रायते गावातील दलित वस्तीमध्ये सदरचे काम सुरू करण्यात आले आहे.

■ यावेळी जिल्हा समन्वयक युवा सेना व संपर्क संघटक शिवसेना कल्याण तालुका उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष संतोष सुरोशी , रायते-पिंपळोली गावच्या सरपंच समिता सुरोशी, उपसरपंच मयुर सुरोशी , सदस्य सुभाष जाधव हरेश पवार, ज्येष्ठ शिवसैनिक तसेच माजी सरपंच लक्ष्मण मोठालकर, जैतू मुठोलकर,विजय सुरोशी, रघुनाथ कांबळे, वसंत रातांबे, दिनेश सुरोशी, विशाल घावट, राजेश दोंदे तसेच अविनाश चंदने ,लीला कांबळे, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरबाड मधील शिरवली धरणात तरुण बुडाला! शोध कार्य सुरू !



● मुरबाड - मुरबाड तालुक्यातील धनिवली येथील तरुण ३० मे२०२४ रोजी १.३० वाजता ते २.०० वा. चे दरम्यान मुरबाड शिरवली धरणात तरुण बुडाल्याची खबर मुरबाड पोलिसांना मिळाली .गणेश रामचंद्र भोईर (वय ३५) राहणार धानवली गाव मुरबाड हे त्यांचे मित्रासोबत पोहण्याकरता गेले असता तो पोहता पोहता पाण्यात बुडाले असल्याचे सोबत असणारे मित्रांनी पोलीस ठाण्यात येऊन कळविल्याने सदर ठिकाणी एमआयडीसी फायर ब्रिगेड स्टाफ व नगरपंचायत फायर ब्रिगेड स्टाफ तसेचमुरबाड पोलीस स्टाफ घटनास्थळी रवाना केले असून शोध कार्य सुरु असल्याची माहिती मुरबाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी दिली.

# शेतकऱ्यांनी कापूस बियाण्यांच्या ठराविक वाणांचा आग्रह धरू नये - कृषी संचालक विकास पाटील

●ठाणे (जिमाका) - महाराष्ट्र कापूस बियाणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु शेतकऱ्यांनी कापसाच्या विशिष्ट वाणांसाठी आग्रह धरू नये, असे आवाहन कृषी संचालक (निविष्ठ व गुण नियंत्रण) विकास पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

महाराष्ट्र राज्यात कापूस पीक क्षेत्र ४०.२० लाख हेक्टर आहे. कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार प्रति हेक्टर ४.२ पाकिटे बियाण्याची आवश्यकता असते. या क्षेत्रासाठी १ कोटी ७० लाख पाकिटाची आवश्यकता आहे. सर्व कंपन्यांचा आढावा घेतला असता, साधारपणे १.७५ कोटी पाकिटे उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात कापूस बियाण्याची कमतरता नाही. महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांमध्ये कापसाच्या काही वाणांना विशेष मागणी आहे. परंतु त्याबरोबर इतर कंपन्यांचे कापसाचे वाण सुद्धा अतिशय चांगले उत्पादन देत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस पिकाच्या ठराविक वाणांचीच मागणी करू नये, याबाबत कृषि विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे.



केंद्र सरकारने खरीप २०२४ साठी कापूस BG II चा दर ८६४ रुपये निश्चित केला आहे. कापूस बियाणे जादा दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र तसेच कापूस उत्पादक कंपनी यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांच्यामार्फत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी कापूस जादा दराने विक्री केली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कृषी विभागातील स्थानिक कृषी सहाय्यक यांच्या मदतीने संबंधित कापूस बियाण्याचे वाटप कृषी विभागाच्या कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्याचे नियोजन संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केलेले आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण एच.टी. बीटी कापूस बियाणेबाबत चंद्रपूर जिल्ह्यात चार ठिकाणी कारवाई करण्यात आल्या. त्यामध्ये ४५६८.३० किलो (एकूण किमत ६६.८५ लाख) बियाणे साठा जप्त करण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यात ३० क्विंटल बियाणे जप्त करण्यात आले.

## थोडक्यात

### केडीएमसी क्षेत्रातील ३ अनधिकृत शाळांची यादी जाहीर

● कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या परवानगी शिवाय सुरु असलेल्या ३ अनधिकृत प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या तिन्ही शाळा इंग्रजी माध्यमाच्या असून यामध्ये एस.जी.टी एलिमेंटरी स्कूल, सांगोडा रोड, स्मशानभूमीजवळ, मांडा टिटवाळा, संकल्प इंग्रजी स्कूल, बल्याणी टिटवाळा, ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, डोंगरवाली माता मंदीर, बल्याणी टेकडी, टिटवाळा (पू) या ३ शाळांचा समावेश आहे. सर्व संबंधित पालकांनी या अनधिकृत शाळांमध्ये आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ नयेत. या शाळेतील विद्यार्थ्यांचे अन्य शाळेत समायोजन करण्यात येईल.

## मिरा भाईंदर महानगरपालिका : मान्सून पूर्व शहर स्वच्छता मोहीम

● मिरा भाईंदर - मा.आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र.से.) यांच्या आदेशान्वये अति. आयुक्त अनिकेत मानोरकर व मा. उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सखोल स्वच्छता अभियान (भाग- ०३) मान्सून पूर्व शहर स्वच्छता अभियान राबविण्यात आले सदर मोहीम अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ३ व ५ यामध्ये मान्सून पूर्व शहर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्सकाढणे, प्लास्टिक पिशवीबंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळेधुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता अशी असंख्य कामे सकाळी ७.०० ते १०.०० वाजेपर्यंत करून घेतली. मा. अति. आयुक्त व मा. उपायुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्तासफाई मोहीम राबवली. तसेच परिसरात भेट देऊन अस्वच्छता पसरवणा-यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" मोहिमेमध्ये प्रभाग समिती क्र. ३ व ५ मधील एकूण १७ किलोमीटर मुख्य व अंतर्गत रस्ते यांची साफसफाई करण्यात आली. १३०० Kg डस्ट साफ करण्यात आली, १९०० Kg सुका कचरा गोळा करण्यात आला. रस्त्यालगतच्या झाडांची छाटणी करून ९०० kg कचरा गोळा करण्यात आला. सदर मोहिमे दरम्यान एकूण ४२ थुकलेल्या जागा साफ करण्यात आल्या ९५ जागी चिटकवण्यात आलेले स्टिकर्स साफ करण्यात आले. तसेच शहरांमध्ये लागलेले ८ अनधिकृत बोर्ड काढण्यात आले. सदर मोहिम दरम्यान शहरांमध्ये रस्त्यावर अस्वच्छता पसरवणाऱ्या आस्थापने वर दंडात्मक कारवाई करून रु.१८५००/- दंड वसूल करण्यात आला तसेच सिंगल युज प्लास्टिक वापर करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. तसेच दि. ०१/०६/२०२४ रोजी प्रभाग समिती क्र. ०१ व ०२ मध्ये सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे.

## कल्याण लोकसभा मतदार संघातील यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज

● कल्याण : कल्याण लोकसभा मतदार संघातील यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज असल्याची माहिती कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली आहे. २० मे रोजी संपन्न झालेल्या मतदान प्रक्रियेच्या कल्याण लोकसभा मतदार संघातील मतमोजणीस डोंबिवली पूर्वेतील वै.ह.भ.प.सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील कै.सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त क्रीडागृहात ४ जून रोजी सकाळी ८ पासून प्रारंभ होणार आहे.

या मतमोजणीसाठी अधिकारी व कर्मचारी वर्गाचे पहिले प्रशिक्षण शिबीर २८ मे रोजी डोंबिवली (पूर्व) येथील सावित्रीबाई फुले कलामंदिरात संपन्न झाले. आता मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचे दुसरे प्रशिक्षण शिबीर ३ जून रोजी सकाळी ६ वाजता डोंबिवली पूर्वेतील वै.ह.भ.प.सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील कै. सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त क्रीडागृहात ठेवण्यात आले आहे.

## रद्द केलेल्या आणि उशिराने धावत असलेल्या लोकल गाडीतील प्रवासामुळे प्रवासी हैराण



● ठाणे : ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचच्या रुंदणीकरणाचे काम मध्य रेल्वेने हाती घेतले आहे. या कामासाठी मध्य रेल्वेच्या बहुतांश रेल्वे सेवा रद्द झाल्या आहेत. तर काही रेल्वे सेवा सकाळपासून उशिराने धावत आहे. त्याचा परिणाम रेल्वेच्या वाहतूक व्यवस्थेवर बसला असून प्रवाशांचे हाल होत आहे. काही प्रवाशांनी रस्ते मार्गाने प्रवास करण्याचा निर्णय घेतला होता परंतु मुंबई नाशिक महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्गावर वाहतूक कोंडी झाल्याने रस्ते मार्गावरही प्रवाशांची कोंडी झाल्याचे चित्र होते.

ठाणे रेल्वे स्थानकातून दिवसाला सहा लाख प्रवासी प्रवास करतात. सर्वाधिक प्रवास हा पाच आणि सहा या लोकलच्या जलद फलटावरून होत असतो. फलाटांवर खाद्याचे स्टॉल, पादचारी पूल, सरकते जीने असल्याने गर्दीच्या वेळेत फलाटावर उभे राहण्यासाठी शक्य होत नव्हते. त्यामुळे सुमारे वर्षभरापूर्वी मध्य रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक पाचच्या रुंदीकरणाचा निर्णय हाती घेतला । होता. विविध तांत्रिक कारणांमुळे विविध तांत्रिक हे काम रखडले होते अखेर मध्यरात्री पासून या कामास सुरुवात झाली आहे. असे असले तरी प्रवाशांना पुरेशी कल्पना नव्हती. अनेक फेऱ्या रद्द झाल्या आहेत. बहुतांश रेल्वेगाड्या सकाळपासून उशिराने धावत आहे. त्याचा परिणाम प्रवाशांना सहन करावा लागला.ज्या प्रवाशाना मेगाब्लॉक बद्दल माहिती होती त्यांनी घरातूनच काम करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे गर्दीमध्ये थोडीफार घट झाल्याचे चित्र होते.

## मान्सून कालावधीतील संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी आपत्ती निवारण आराखडा तयार करावा - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

● ठाणे (जिमाका) - पावसाळ्यात होणाऱ्या आपत्ती टाळण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी आतापासून आपत्ती निवारण आराखडा तयार करावा. तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रादेशिक आपत्ती नियंत्रण कक्ष उभारावे. तसेच संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने प्राथमिक उपाययोजनासंदर्भात प्रशिक्षण सत्र आयोजित करावेत, अशा सूचना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत देण्यात आल्या.

मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने पूर्व तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, ठाणे महानगरपालिका उपायुक्त जी.जी. गोदापुरे, महामार्ग पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपअधीक्षक विजय डोबल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिद्धार्थ तांबे, लघु पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता संदीप नलावडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी दीपक कुटे, ठाणे महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक निकम, भिवंडी महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजेंद्र वर्णीकर यांच्यासह दूरसंचार विभाग, नागरी संरक्षण दल, वाहतूक विभाग, महावितरण, एनडीआरएफ, एसडीआरएफ व टीडीआरएफचे अधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, प्रादेशिक परिवहन विभाग आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.



■ मान्सून काळात जिल्ह्यात कोणतीही आपत्ती घडू नये, यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे. तसेच संभाव्य आपत्ती निवारणासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. पावसाळ्याच्या कालवधीत पावसाची आकडेवारी नोंदविण्यासाठी पर्जन्यमापक यंत्रे सुव्यवस्थित ठेवणे, दैनंदिन पर्जन्यमानाची आकडेवारी गोळा करणे, आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू ठेवावे, धोकादायक पूल, रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावे, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

■ मान्सून कालावधीत साप, विंचू दंश यावरील प्रभावी औषधांचा साठा उपलब्ध करावा. साथीच्या रोगांवरील उपाययोजना करण्यासाठीही औषधे/लसींचा साठा पुरेशा प्रमाणात ठेवण्यात यावा. जनावरांना होणारे आजारांसाठी लागणारे औषधे उपलब्ध होतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

## ठाणे स्थानक परिसराने घेतला मोकळा श्वास

● ठाणे : स्थानक परिसरात नेहमीच नागरिकांचा गजबजात पाहायला मिळतो. अनेकदा नागरिकांना येथून मार्ग काढणे कठीण होते, इतकी रहदारी याठिकाणी असते. परंतू, मध्य रेल्वेने शुक्रवार पासून घेतलेल्या मेगाब्लॉकमुळे स्थानक परिसराने मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले. नागरिकांची अगदी तुरळक गर्दी या ठिकाणी होती. नेहमी रिक्षाची वाट पाहत उभे असणारे प्रवासी आज हे चित्र बदललेले होते. रिक्षा चालक प्रवाशांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून आले.

ठाणे मध्यवर्ती शहर असून येथे लोकवस्ती मोठ्याप्रमाणात आहे. त्यामुळे शहराची लोकसंख्याही जास्त आहे. शहरातील वेगवेगळ्या भागातून मोठ्यासंख्येने नागरिक दररोज ठाणे रेल्वे स्थानकातून प्रवास करतात. त्यामुळे स्थानक परिसर सकाळ- संध्याकाळ गजबजलेला दिसून येतो. दररोज गावदेवी मंदिरापासून ते स्थानक पर्यंत प्रवाशांची रहदाळी पाहायला मिळत असते. परंतू, शुक्रवारी मेगाब्लॉकमुळे हे चित्र बदलेले दिसून आले. ऐन शुक्रवार म्हणजेच कामाचा दिवस असून देखील स्थानक परिसरात नागरिकांची रहदारी नव्हती. स्थानक परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला होता.

मध्य रेल्वे महामार्गावरील काही महत्त्वाचे कामे करण्यासाठी शुक्रवार पासून मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे, अशी पूर्व सुचना मध्य रेल्वे मार्फत देण्यात आली होती. त्यानुसार, अनेक कार्यालयांनी कर्मचाऱ्यांना या मेगाब्लॉकचा त्रास होऊ नये यासाठी घरातून काम करण्याची सुचना दिली होती. तर, काही नोकरदारांनी स्वतःच्या वाहनांनी किंवा खासगी वाहनाने कार्यालय गाठले.

# रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात हे पदार्थ

मधुमेहाच्या रुग्णाने नेहमी त्याच्या आहाराबाबत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवणे महत्वाचे आहे. मधुमेह तेव्हा होतो जेव्हा एकतर आपले शरीर पुरेसे इन्सुलिन बनवत नाही किंवा त्याचा प्रभावी वापर करू शकत नाही. तुम्हाला मधुमेहाचे निदान झाल्यास, तुमच्या डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधे घेण्याव्यतिरिक्त, तुम्ही तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नैसर्गिकरित्या नियंत्रित करणारे पदार्थ देखील घेऊ शकता.

**भेंडी**

भेंडी फायबरने समृद्ध असते. त्यामुळे भेंडी खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत होते. भेंडी इन्सुलिनचे उत्पादन वाढवते आणि त्याचे स्राव देखील वाढवते. भेंडीच्या बियांमध्ये अल्फा ग्लुकोसिडेस इनहिबिटर असतात जे स्टार्चला ग्लुकोजमध्ये बदलण्यापासून रोखतात. मधुमेह नियंत्रणासाठी भेंडीचे फायदे मिळवण्याचा एक मार्ग म्हणजे भेंडी रात्रभर पाण्यात भिजवून ठेवणे आणि दुसऱ्या दिवशी ते पाणी सेवन करणे.

**मेथीचे दाणे**

दोन चमचे मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात



भिजवून दररोज सकाळी रिकाम्या पोटी घेतल्याने तुमच्या ग्लुकोजची पातळी कमी होऊ शकते. तुम्ही मेथीच्या बियांची पावडर रोज गरम किंवा थंड पाण्यासोबत किंवा दुधासोबत घेऊ शकता.

**दालचिनी**

मसाल्यातील एक महत्त्वाचा पदार्थ असलेली दालचिनी इन्शुलिन रेझिस्टंस वाढवण्यास आणि मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. जेवल्यानंतर वाढणारी रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास दालचिनी फायदेशीर ठरते. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी किंवा काढा घ्यायला हवा.

**कारले**

कारल्याचा रस मधुमेही रुग्णासाठी खूप फायदेशीर आहे. त्यात कॅराटीन आणि मोमोर्डिसिन असतात. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास हे मदत करतात. तुम्ही सकाळी कारल्याचा रस पिऊ शकता. यामध्ये आपण आवळा किंवा आपल्या आवडीची कोणतीही भाजी घालू शकता आणि काही मिरपूड आणि मीठ घालू शकता. मधुमेह नियंत्रण ठेवण्यासाठी, सकाळी एक ग्लास कारल्याचा रस पिणे खूप फायदेशीर आहे.

**जांभूळ**

मधुमेह असलेल्या लोकांसाठी जांभूळ एक फायदेशीर फळ आहे. साखर नियंत्रित करण्यासाठी हे खूप चांगले आहे. जांभळामध्ये जॅमोबोलिन नावाचे संयुग असते. जॅमोबोलिन मुख्यतः जांभळाच्या बियांमध्ये असते जे रक्तातील साखर कमी करण्यास मदत करते.

**पुरेसे पाणी प्या**

शरीरातील हायड्रेशनची पातळी राखण्याबरोबरच, पुरेसे पाणी पिल्याने मूत्रपिंडांना लघवीद्वारे अतिरिक्त रक्तातील साखर बाहेर टाकण्यास मदत होते. लक्षात ठेवा, मधुमेह व्यवस्थापन ही आजीवन वचनबद्धता आहे आणि योग्य काळजी, आहार आणि जीवनशैलीच्या निवडीमुळे तुम्ही निरोगी आणि परिपूर्ण जीवन जगू शकता.

# पाकिस्तानची फजिती! 'लड्डू' आझमकडून सोपा झेल सुटला; हारिस रौफ बघतच राहिला

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तानला चार सामन्यांच्या ट्वेंटी-२० मालिकेत ०-२ असा दारूण पराभव पत्करावा लागला. पावसामुळे या मालिकेतील दोन सामने रद्द करावे लागले. गुरुवारी झालेल्या निर्णायक सामन्यात मोठा विजय मिळवून इंग्लिश संघाने शेजाऱ्यांना पराभवाची धूळ चारली. या सामन्यात अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. फिटनेसमुळे ट्रोल होणाऱ्या आझम खानने त्याच्या खराब क्षेत्ररक्षणाने पुन्हा एकदा टीकाकारांना आमंत्रण दिले.



इंग्लिश खेळपट्टीवर हारिस रौफ वगळता एकाही पाकिस्तानी गोलंदाजाला बळी घेता आला नाही. पण, हारिसला यष्टीरक्षक आझम खानने म्हणावी तशी साथ दिली नाही. त्याने दोन सोपे झेल सोडून यजमानांना मदत केली. हारिस रौफच्या गोलंदाजीवर प्रतिस्पर्धी संघाचा कर्णधार जोस बटलरचा यष्टीरक्षकाने सोपा झेल सोडला. हे पाहताच हारिस रौफने एकच संताप व्यक्त केला. या झेलचा दाखला देत चाहते आझमला बेक्कार ट्रोल करत आहेत. हारिस रौफचे हावभाव सर्वकाही सांगत आहेत.

तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना नेहमीप्रमाणे पाकिस्तानने संथ गतीने धावा केल्या. यावेळी शेजाऱ्यांना निर्धारित २० षटके देखील खेळता आली नाहीत आणि संघ १९.५ षटकांत अवघ्या १५७ धावांवर गारद झाला. मोहम्मद रिझवान (२३), बाबर आझम (३६), उस्मान खान (३८) आणि इफ्तिखार अहमदने (२१) धावा करून १५० पार धावसंख्या पोहोचवली. इंग्लिश गोलंदाजांनी सांघिक कामगिरी करताना मार्क वुड (२), लियाम लिव्हिंगस्टोन (२), आदिल राशिद (२), जोफ्रा आर्चर, ख्रिस जॉर्डन आणि मोईन अलीला (१) बळी घेण्यात यश आले.

**शेजाऱ्यांचा ०-२ ने दारूण पराभव**

पाकिस्तानने दिलेल्या १५८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडने सहज विजय साकारला. अवघ्या १५.३ षटकांत १५८ धावा करून यजमानांनी २-० ने मालिका खिशात घातली. फिल साल्टने २४ चेंडूत ४५ धावांची स्फोटक खेळी करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर कर्णधार जोस बटलरने ३९ धावा केल्या. इंग्लिश फलंदाजांनी अखेरच्या सामन्यात देखील पाकिस्तानी गोलंदाजांची बेक्कार धुलाई केली. हारिस रौफला सर्वाधिक (३) बळी घेता आले, पण त्याने त्याच्या ३.३ षटकांत ३८ धावा दिल्या. शाहीन शाह आफ्रिदी, मोहम्मद आमिर आणि नसीम शाह यांच्या हाती एकही शिकार लागली नाही. किंबहुना त्यांची निर्णायक सामन्यातही लाज गेली.

# अमिताभच्या पोस्टमुळे ऐश्वर्याच्या चाहत्यांमध्ये नाराजी

गेल्या काही दिवसांपासून बच्चन परिवारामध्ये तेढ निर्माण झाली असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. बऱ्याच कालावधीपासून बच्चन कुटुंबियातील सदस्य ऐश्वर्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. आता हल्लीच अमिताभ बच्चन यांनी एक पोस्ट केली जी पोस्ट त्यांचा मुलगा अभिषेक आणि सून ऐश्वर्या ह्यांच्याशी संबंधित आहे. खरंतर त्यांनी एका युजरच्या पोस्टला रिट्वीट केलं आहे ज्यात त्यांनी सांगितलंय की कजरा रे गाण्याला रिलीज होऊन १९ वर्षे पूर्ण झाली आहेत.

बिग बींनी लिहिलं आहे, "हे गाणं इतके पॉप्युलर झालं होतं की आजही या गाण्याला रसिकांचं भरभरुन प्रेम मिळतंय. या गाण्यातील सर्वोत्कृष्ट क्षण म्हणजे आम्ही या गाण्याला मंचावर लाईव्ह परफॉर्म केलं होतं" हे गाणं 'बंटी आणि बबली' या चित्रपटातील आहे. ज्यात अमिताभ आणि अभिषेक प्रमुख भूमिकेत होते तर ऐश्वर्या यात पाहुणी कलाकार म्हणून दिसली होती.



आता बिग बींनी आपल्या पोस्टमध्ये ऐश्वर्यासंबंधी काहीही म्हटलेलं नाही आणि तिला टॅगदेखील केलेलं नाही. ज्यामुळे चाहते बरेच नाराज झाले. काहींनी कमेंट करत म्हटलं आहे की या गाण्यात प्रमुख ऐश्वर्या होती आणि तुम्ही दोघे सहायक डान्सरच्या भूमिकेत होता. तर एकाने म्हटलंय की या गाण्यात ऐश्वर्यासुद्धा आहे तुम्ही तिला टॅग केलेलं नाही फ़क्त तुमच्या मुलाला टॅग केलं आहे. तुम्ही आणि तुमचे कुटुंबीय ज्याप्रकारे तिला साईडलाइन करताय ते पाहून दुःख होतं. ती खूप प्रतिभावान आहे.

याआधी जेव्हा पॅरिस फॅशन वीकमध्ये ऐश्वर्या आणि बिग बींची नात नव्या नवेली नंदा गेले होते तेव्हा अमिताभची मुलगी श्वेता हिने फक्त नव्यासंबंधीच वक्तव्य केलं आणि भावजयीच्या कार्यक्रमाला ती उपस्थितही राहिली नाही. त्यादरम्यान श्वेताला अनेक नेटकऱ्यांनी ट्रोल केलं होतं.

जेव्हा ऐश्वर्या कान्स फिल्म फेस्टिव्हलला गेली होती तेव्हा तिच्यासोबत यंदा अभिषेक बच्चन नव्हता. प्रत्येक वेळी ऐश्वर्याला पाठिंबा देण्यासाठी तिच्यासोबत कान्सला जाणारा अभिषेक यावर्षी मात्र गेला नाही. आता नेमकं कामाचं कारण होतं की आणखी काही होतं हे अद्याप कळू शकलेलं नाही. परंतु त्यांची मुलगी आराध्या आवर्जून तिच्या आईला पाठिंबा देण्यासाठी सोबत गेली होती.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

१९५५: एअर इंडिया ची मुंबई - टोकियो विमानसेवा सुरू झाली.

१९४६: सोनी कंपनी ची स्थापना झाली.

१९०७ : मुंबईत विजेवर चालणारी ट्रॅम सुरू झाली.

१८४९ : जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९: गोपाल निमाजी वाहनवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४)

१९४८ : नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन: १४ जून २०२०)

१९२३ : आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्य अभिनेते व दिग्दर्शक

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१: प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ऍलन मॅक्लिओड कॉमॅक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)

१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

# जगज्जेत्या बुद्धिबळपटूवर भारताच्या १८ वर्षीय आर प्रज्ञानंदने मिळवला पहिला विजय



नवी दिल्ली : १८ वर्षीय ग्रँडमास्टर भारतीय बुद्धिबळपटू आर प्रज्ञानंदने मोठी कामगिरी केली आहे. त्याने कारकिर्दीत पहिल्यांदाच जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनवर विजय मिळवला आहे. आर प्रज्ञानंदने स्टॅव्हॅन्गर येथील नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत ही कामगिरी केली. गेल्या वर्षी झालेल्या फिडे विश्वचषकामध्ये उपविजेता ठरलेल्या आर प्रज्ञानंदने कार्लसनला पराभूत करणारा चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे. प्रज्ञानंदने तिसऱ्या फेरीअखेर ९ पैकी ५.५ गुणांसह नॉर्वे बुद्धिबळ २०२४ मध्ये आघाडीवर आहे. तर, झालेल्या पराभवामुळे मॅग्नस कार्लसनची स्पर्धेत पाचव्या स्थानावर घसरण झाली.

मुळचा नॉर्वेचा असलेल्या मॅग्नस कार्लसनला त्याच्याच होम ग्राउंडवर मात प्रज्ञानंदने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली आहे. कार्लसनला याआधी विश्वनाथन आनंद, पेंटाला हरिकृष्ण आणि कार्तिकेयन मुरली या भारतीय बुद्धिबळपटूंनी हरवलेले आहे. प्रज्ञानंदने सुरुवातीच्या चालीपासून कार्लसनवर दबाव टाकला होता. त्याने कार्लसनचा बचाव पद्धतशीरपणे मोडून काढला. विजयानंतर तो म्हणाला की, "हा विजय भारतीय बुद्धिबळपटूंच्या कठोर परिश्रमाचा आणि समर्पणाचा पुरावा आहे. हा आपल्या देशासाठी अभिमानाचा क्षण आहे, आणि मला आशा आहे की यामुळे अधिक तरुणांना या खेळात सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळेल आणि सर्वोच्च पुरस्कार मिळविण्याचे उद्दिष्ट मिळेल." अशा भावना त्याने व्यक्त केल्या.

# चुकूनही ही फळे एकत्र खाऊ नका

फळे खाणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. सफरचंद, केळी, डाळिंब, मोसंबी, द्राक्षे, लिंबू अशी अनेक फळे आहेत, जे खाल्ल्याने आरोग्य चांगले राहते. फळे खाल्ल्याने अनेक आजारांमध्ये आराम मिळतो. तुम्ही एकाच वेळी अनेक फळे एकत्र करुन खात असाल तर काळजी घ्या. फळांचे काही कॉम्बिनेशन आरोग्याला फायदा करण्याऐवजी नुकसान करतात. ज्यांच्याबद्दल माहित असणे आवश्यक आहे.

**गाजर आणि संत्री**

जर तुम्ही फळांचे चाट बनवून खात असाल तर गाजर आणि संत्री एकत्र कधीही खाऊ नका. हे दोन्ही एकत्र खाल्ल्याने किडनीवर वाईट परिणाम



होतो. संत्री आणि गाजर एकत्र खाल्ल्याने छातीत जळजळ आणि पित्ताचा त्रास होतो.

**टरबूज आणि खरबूज**

उन्हाळ्यात मिळणारी ही दोन्ही फळे आरोग्यासाठी फायदेशीर असतात. परंतू ती एकत्र खाल्यास अपचन आणि पोटाच्या इतर समस्या उद्भवू शकतात.त्यामुळे हे पदार्थ सोबत खाणे टाळावे.

**काकडी आणि टोमॅटो**

सॅलेड म्हणून अनेकदा काकडी आणि टोमॅटो एकत्रित खाल्ले जातात. मात्र यामुळे पोटांचे आजार होऊ शकतात. हे दोन पदार्थ एकत्रित खाल्ल्यास गॅस, ब्लोटिंग, पोटदुखी, थकवा, अस्वस्थ वाटणे अशा समस्या उद्भवू शकतात.

**संत्री आणि पपई**

संत्री हे देखील आंबट फळ आहे. ज्याचे पपई सोबत कधीच सेवन करु नये. पपई आणि संत्री एकत्र खालली तर यामुळे तुमचे आरोग्य बिघडू शकते. त्यामुळे याचे सेवन करणे टाळावे.

जर तुम्हाला फ्रूट चाट बनवायची असेल आणि खायची असेल तर नेहमी योग्य कॉम्बिनेशनची फळे एकत्र मिक्स करा. चार ते पाच फळे एकत्र खाऊ नका. टरबूज हे असे फळ आहे जे नेहमी एकटेच खावे.

## राशि भविष्य

**मेष** तुमच्याकडे प्रचंड प्रमाणात ऊर्जा आहे - परंतु कामाच्या ताणामुळे तुम्ही त्रासून जाल. आज तुमच्यासमोर सादर झालेल्या गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा. अनुरुपांसाठी वैवाहिक संबंध जुळून येतील. वैयक्तीक मार्गदर्शन तुमचे नातेसंबंध सुधारतील.

**वृषभ** तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा - आणि फक्त महत्त्वाच्या आवश्यक गोष्टींचीच आज खरेदी करा. तुमचा जोडीदार काळजी घेईल. तुमच्या आयुष्यावर प्रेमाचा वर्षाव होणार आहे.

**मिथुन** प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे. कार्यालयीन कामकाजात गुंतून राहिल्यामुळे जोडीदाराशी तुमचे संबंध तणावाचे बनतील.

**कर्क** वाद, संघर्ष टाळा, अन्यथा तुमच्या आजारात भर पडेल. ज्या लोकांनी कुणी अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्यावर काही धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमच्या जवळच्या माणसांबरोबर कोणताही वादविवाद छेडू नका.

**सिंह** काही टाळता न येण्याजोग्या घटनांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. परंतु तुम्ही भांबावून न जाता आणि त्यावर घाईघाईने प्रतिक्रिया न देता शांतपणे परिस्थिती हाताळा. परदेशात असलेली तुमची जमीन आज चांगल्या भावात विकली जाऊ शकते यामुळे तुम्हाला नफा होईल.

**कन्या** तुमच्या अविचारी वागणुकीमुळे तुमच्या एखाद्या मित्राला तुम्ही अडचणीत टाकाल. घरातील गरजेचे सामान खरेदी केल्याने तुम्हाला आर्थिक चिंता नक्कीच होईल परंतु, यामुळे तुम्ही भविष्यातील बऱ्याच समस्यांनी सुटाल. तुम्हाला निवांत आरामाची गरज आहे आणि जवळचे मित्र व कुटुंबातील सदस्यांमध्ये राहून आनंदाचा काळ घालवा.

**तूळ** तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. या राशीतील काही लोकांना आज संतान पक्षाकडून आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. आज तुम्हाला आपल्या मुलांवर गर्व वाटेल. आपल्या पालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आणि काळजी घेण्याची गरज भासेल.

**वृश्चिक** रक्तदाबाचे रुग्ण त्यांचा रक्तदाब कमी करण्यासाठी आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी रेड वाईनची मदत घेऊ शकतात. त्यातून त्यांना आराम लाभेल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. आपल्या पुढील पिढीसाठी विशेष नियोजन करा.

**धनु** नातेवाईकांबरोबरील हास्यविनोदाने तुमच्या मनावरील दडपण हलके होईल आणि आत्यंतिक गरज असणारा रिलिफ मिळेल. तुम्ही सुदैवी असल्यामुळेच असे नातेवाईक तुम्हाला लाभतील. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे.

**मकर** कामामध्ये मर्यादेपलिकडे स्वत:ला खेचू नका, योग्य ती विश्रांती घेण्याची आठवण ठेवा. ज्या लोकांनी कुणाकडून उधार घेतलेले आहे त्यांना आज कुठल्या ही परिस्थितीत उधार चुकवावे लागू शकते ज्यामुळे आर्थिक स्थिती थोडी कमजोर होईल. मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल.

**कुंभ** भरपूर प्रवासामुळे तुम्ही उन्मादी बनाल. जर तुम्ही विद्यार्थी आहेत आणि परदेशात जाऊन शिक्षण इच्छा आहे तर, घरातील आर्थिक स्थिती तुमच्या डोक्यावर भार असेल. तुमच्या उदार वागणुकीचा तुमचे नातेवाईक विनासायास फायदा घेण्याची शक्यता आहे.

**मीन** कामाच्या धबडग्यात मधेमध्ये थोडा आराम करा, विश्रांती घ्या आणि रात्रीची जागरणे टाळा. आजच्या दिवशी तुम्हाला आपल्या त्या मित्रांपासून सावध राहायचे आहे जे तुमच्याकडून उधार मागतात आणि नंतर परत करत नाही. मुलांकडून एखादी थरारक बातमी मिळण्याची शक्यता आहे.

# देशातील सर्वोत्तम संचालनालय होण्याचा बहुमान महाराष्ट्र एनसीसीला राज्यपालांचे प्रशस्तीपत्र प्रदान

## एनसीसी प्रशिक्षणामुळे समाजाप्रती जबाबदार नागरिक घडतात - राज्यपाल रमेश बैस

● मुंबई : एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त व समाजसेवेचे संस्कार घडतात. सर्वांकरीता एनसीसी प्रशिक्षण अनिवार्य झाले तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल. एनसीसी प्रशिक्षणामुळे समाजाप्रती जबाबदार नागरिक घडतात, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महाराष्ट्र संचालनालयाला सर्वोत्कृष्ट संचालनालय ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ३०) राजभवन येथे 'राज्यपालांचे प्रशस्तीपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.



राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या 'प्रशस्तीपत्र प्रदान सोहळयात' राज्यपालांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंदर सिंह यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

आपण स्वतः एनसीसी कॅडेट होतो असे नमूद करून देशातील शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व जाणवले, तर देश अतिशय वेगाने प्रगती करेल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने आजपर्यंत २३ वेळा पंतप्रधानांचे ध्वजनिशान जिंकले. तसेच ८ वेळा महाराष्ट्र संचालनालय उपविजेते ठरले आहे, याबद्दल राज्यपालांनी राज्यातील एनसीसीच्या सर्व अधिकारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एनसीसी कार्यरत असून एकूण १.१७ लाख कॅडेट्स कार्यरत आहेत. पुढील १० वर्षांत कॅडेट्सची राज्यातील संख्या १.८५ लाख इतकी वाढविली जाणार आहे, हे कौतुकास्पद आहे असे राज्यपालांनी सांगितले.

एनसीसी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात काम करताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे आवाहन राज्यपालांनी विद्यार्थ्यांना केले.

या सोहळयाला भारतीय सैन्यदलातील वरिष्ठ अधिकारी, शासनाचे अधिकारी, विद्यापीठांचे कुलगुरु तसेच विविध महाविद्यालयांमधील एनसीसीचे कॅडेट्स उपस्थित होते. यावेळी एनसीसीच्या चमूने एक रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

# उत्तराखंड मधील पवित्र चारधाम दर्शनासाठी भाविकांनी नोंदणी करावी - जिल्हाधिकारी संजय यादव

● मुंबई : उत्तराखंडमध्ये पवित्र चारधामला भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उत्तराखंड शासनाने या काळात होणाऱ्या गर्दी व्यवस्थापनासाठी दि. ३१ मे, २०२४ पर्यंत कोणत्याही प्रकारची "व्हीआयपी दर्शन"सुविधा देण्यात येणार नसल्याचे एका पत्राद्वारे सर्व राज्यांना कळविले असून पवित्र चारधाम दर्शनासाठी भाविकांनी नोंदणी करावी, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी केले आहे.



चारधाम यात्रेतील दर्शनाची प्रक्रिया सुसंगत करण्यासाठी, उत्तराखंड सरकारने चारधाम यात्रेसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. सर्वांसाठी नोंदणी अनिवार्य आहे. तरी सर्व भक्तांनी चारधाम यात्रा २०२४ च्या नोंदणीसाठी https://registrationandtouristcare.uk.gov.in/ या संकेतस्थळावर भेट द्यावी. नोंदणी केलेल्या यात्रेकरुंनाच दर्शनासाठी परवानगी देण्यात येईल.

तसेच जेष्ठ नागरिकांनी चारधाम यात्रेपूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनाचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन उत्तराखंड शासनाने केले आहे.

उत्तराखंड शासनाने केलेल्या आवाहनानुसार मुंबई शहर जिल्ह्यातील चारधाम यात्रेसाठी इच्छुक असणाऱ्यांनी नाव नोंदणी करावी तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय यादव यांनी केले आहे.

# १०० जणांना रोजगार देणारे कल्पेश ठाकूर सारख्या मराठी तरुणांची महाराष्ट्राला गरज - उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

● पाली - मुंबई गोवा महामार्ग तयार होत असताना अनेक अडचणी आल्या महामार्गमंत्री ना.नितीन गडकरी यांच्या जवळही अनेक वेळा चर्चा करण्यात आल्या. या दरम्यान जुन्या रस्त्यांवर अनेक अपघात झाले आहेत. प्रत्येकाचा प्रवास सुखकर व्हावा अशी सर्वांचीच अपेक्षा असते आणि कोकणात येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांना पर्यटनाचा वेगळा आनंद मिळाला पाहिजे. पण दुर्दैवाने अशा महामार्गावर अपघात होत असताना त्यांना मदत करण्याचे सेवा भावी काम पेण येथील कल्पेश ठाकूर हे करत आहेत, ते खरे देवदूत आहेत. त्यांच्या मुळे अनेक कुटुंबाना आणि कुटुंबातील माणसाला जिवदान मिळालेले आहे. त्याच्या रुग्ण सेवे बरोबर कोकणात जाणारे व येणारे पर्यटक ही निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या सुसज्ज अशा साई सहारा रेस्टोरंटच्या हॉटेलच्या चविष्ट जेवणाची चव चाखण्यासाठी येतील व येथील पर्यटनातही वाढ होईल, किमान १०० जणांना रोजगार देणाऱ्या कल्पेश



ठाकूर सारख्या मराठी तरुणांची महाराष्ट्राला गरज असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी देवदूत कल्पेश ठाकूर यांच्या रुग्णसेवा कार्यअहवालाचे व साई सहारा रेस्टॉरंट च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना भरभरून कौतुक केले.

मुंबई गोवा महामार्गवरील अपघातग्रस्त नागरिकांसाठी "देवदूत" ठरलेल्या पेण येथील कल्पेश शरद ठाकूर यांच्या रुग्णसेवा कार्यअहवाल प्रकाशन व साई सहारा रेस्टोरंटच्या उद्घाटन निमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर खासदार सुनील तटकरे, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पेण विधानसभा मतदार संघांचे आमदार रवींद्र पाटील, अलिबाग विधानसभा मतदार संघांचे आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार व भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, युवा नेते वैकुंठ पाटील, नगराध्यक्षा प्रितम पाटील, उद्योजक यशवंत घासे, तालुकाध्यक्ष दयानंद भगत, नरेंद्र ठाकूर, देवा पेरवी, सुनिल पाटील, नरेश पवार, विकी ठाकूर आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी बोलताना देवदूत कल्पेश ठाकूर यांच्या अपघातग्रस्त यांना मदत व आरोग्य सेवेचे कौतुक करताना सांगितले की, अनेक वर्ष महामार्गावर अनेक अपघात झाले पण आता महामार्गाचे काम प्रगती पथावर आहे. इथे होणाऱ्या अपघातावेळी अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी देवदूत बनून कल्पेश ठाकूर हा तरुण पुढे येऊन करत आहे. आज त्याच्या साई सहारा रेस्टोरंटचे उद्घाटन व रुग्णसेवा कार्यअहवाल प्रकाशन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले आहे असे बोलून हॉटेल व्यवसाय लवकरच नावा रूपाला येवो अशा शुभेच्छा दिल्या.

तर पेण विधानसभा मतदार संघांचे आमदार रवींद्र पाटील, अलिबाग विधानसभा मतदार संघांचे आमदार महेंद्र दळवी, पेणचे माजी आमदार व जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुंबई गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांचे वाली व युवा उद्योजक कल्पेश ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय भुस्कुटे तर आभार संजय ठाकूर यांनी मानले. कल्पेश ठाकूर यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते.

# नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम

● मुंबई : सद्यःस्थिती लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तरी आदर्श आचारसंहिता अद्यापपर्यंत सुरु असून त्यात कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्यात आलेली नाही. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

आचार संहिता कालावधीत एखाद्या अत्यंत तातडीच्या प्रकरणी आचार संहितेतून सूट देऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे, अशी प्रकरणे निवडणूक आयोगास शिफारस करण्यासाठी या कार्यालयाच्या दि.२८.२.२०२४ च्या परिपत्रकान्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने शिफारस केलेले प्रस्ताव या कार्यालयामार्फत भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. लोकसभा निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने आचार संहिता लागू झाल्यापासून आतापर्यंतच्या कालावधीत अशा एकूण ५९ प्रस्तावांवर भारत निवडणूक आयोगाने निर्णय दिला आहे. तरी आचार संहिता कालावधीत आचारसंहितेचे कटाक्षाने पालन केले जाईल, याची सर्व संबंधितांद्वारे दक्षता घेण्यात यावी.

भारत निवडणूक आयोगाने दि.१६.३.२०२४ च्या प्रसिद्धीपत्रकान्वये देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित करुन आदर्श आचार संहिता लागू केलेली आहे. आदर्श आचार संहितेच्या कालावधीमध्ये "काय करावे" व "काय करु नये" याबाबतच्या तसेच इतर विविध विषयाबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना भारत निवडणूक आयोगाच्या दि.२.१.२०२४ च्या एकूण आठ पत्रान्वये स्वतंत्ररित्या देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचे कटाक्षाने पालन करावे. निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या दि.५.३.२०२४ व ७.३.२०२४ च्या पत्रांद्वारे सर्व संबंधित यंत्रणास





सूचना देण्यात आलेल्या आहेत.

नाशिक व कोकण विभागात विधानपरिषद निवडणूकीची आचारसंहिता

नाशिक व कोकण विभागातील महाराष्ट्र विधानपरिषदेवरील दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघाच्या सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. सदर रिक्त होणाऱ्या पदांसाठी भारत निवडणूक आयोगाने दि.२४.५.२०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकान्वये निवडणूक कार्यक्रम घोषित केला असून प्रसिद्धीपत्रक जारी केलेल्या दिनांकापासून संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. या कालावधीत पालन करावयाच्या आदर्श आचार संहितेबाबतच्या सविस्तर सूचना भारत निवडणूक आयोगाच्या दि.२६.१२.२०१६ च्या पत्रामध्ये देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचे कटाक्षाने पालन करण्यात येईल, याची सर्व संबंधितांद्वारे दक्षता घेण्यात यावी,असे प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# Road closures and traffic diversions in place due to ongoing construction on Ganeshkhind road



● Pune - Pune city police have come up with a traffic diversion plan to prevent congestion on Ganeshkhind road during the ongoing Metro construction work between Shivajinagar court and Savitribai Phule Pune University (SPPU) junction.

Accordingly, the flow of vehicles on the Ganeshkhind road will be diverted as per the temporary traffic diversion plan on experimental basis from June 1 till further orders, said deputy commissioner of police (traffic) Rohidas Pawar.

A press release issued by Pawar on Thursday stated that construction of a porter beam at SPPU junction, relocating the water supply lines near COEP hostel and raising five new pillars for the Metro project are some of the works that are ongoing across the Ganeshkhind road.

During a press conference on Thursday, additional commissioner of police Manoj Patil and DCP Pawar shared details of the traffic diversion plan.

As per the plan, to prevent traffic jams, all vehicles are banned from Range Hills chowk to Shivajinagar via Ganeshkhind Road.

Vehicles going to Shivajinagar would be diverted to Narveer Tanaji Wadi junction via Agriculture College, to reach Shimla office chowk. From the Shimla office, vehicles can further go to Pune Railway, RTO or Ahmednagar highway using the underpass.

# Amid heatwave, Delhi govt move SC seeking water supply from UP, Haryana

● New Delhi - The Delhi government has approached the Supreme Court on Friday over the escalating water crisis in the national capital. The government is demanding additional water supply from the neighboring states of Haryana, Uttar Pradesh, and Himachal Pradesh for a duration of one month. Emphasizing the collective responsibility of ensuring adequate water supply, Delhi officials argue that, as the capital of the nation, meeting its increased water demand is crucial.



In other political news, Delhi Chief Minister Arvind Kejriwal has moved two pleas in the Rouse Avenue court — one seeking regular bail in the money laundering case related to the excise policy "scam", and another for a seven-day extension on his interim bail on medical grounds. Special Judge Kaveri Baweja will hear the interim bail plea on June 1, and the regular bail plea on June 7.

How's the weather in Delhi today? According to the India Meteorological Department (IMD), Delhi will experience dust storms and thunderstorms on Friday, offering brief relief from the record-breaking temperatures and severe heatwave. The city is expected to experience temperatures ranging from a minimum of 29 degrees Celsius to a maximum of 44 degrees Celsius.

# Voter turnout in Maharashtra: Women lag behind men by 4%



● Mumbai - In the recent five–phase general elections held in the state, women lagged behind men regarding voter turnout by 4 percentage points. As per the official data of absolute numbers, a total of 2.63 crore of a total of 4.46 crore women electors cast their vote, which translates to around 59 per cent of the total female voters.

In comparison, a total of 3.06 crore men out of a total of 4.83 crore men cast their votes, making for 63 per cent of men who voted. The total number of voters in Maharashtra who cast the ballot this election was 61.33 per cent.

Of a total of 9.29 crore voters in Maharashtra, 5.70 crore cast their votes. Of 5,720 other gender electors, as many as 1,450 have voted in this election. This is a marginal increase compared to 2019 elections when 60.79 per cent of voters in the state cast their votes. Despite the higher percentage of male voters, Raigad is the only constituency of the state's 48 seats, wherein women have voted in higher numbers than men. In Raigad, of 10.09 lakh people who voted, as many as 5.09 lakh were women and 5 lakh were men. The difference in men and women voters in terms of numbers was the least in Ratnagiri – Sindhudurg, at 10,591, while it was the highest in Beed at 1.42 lakh. The tribal-reserved seat of Gadchiroli–Chimur recorded the highest number of voter turnout in Maharashtra at 71.88 per cent, followed by Kolhapur at 71.59 per cent and neighbouring Hatkanangle at 71. 11 per cent.

# तब्बल 18 वर्षानंतर शिक्षकांची आपापल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्ती, अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू

● सातारा - प्राथमिक शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे पवित्र काम करत असताना अनेकांना आपल्या मायभूमीतून कर्मभूमीत जावे लागले. आखिर तब्बल १८ वर्षानंतर सातारा जिल्ह्यातून आपापल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्ती मिळाल्यामुळे अनेक शिक्षकांना आनंद अश्रू आवरता आले नाहीत. आम्ही प्राथमिक शिक्षक म्हणून जातो आमच्या गावा,,, आमचा राम राम घ्यावा,, ही भावनिक साद प्राथमिक शिक्षकांनी घातली .

सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर चार महिन्यापूर्वी विराजमान झालेल्या श्रीमती यशानी नागराजन यांनी व प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती शबनम मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ८४ प्राथमिक शिक्षकांना अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड अशा जिल्ह्यात तब्बल १५ ते १८ वर्षांनी प्राथमिक शिक्षक म्हणून जाण्याची संधी मिळाली आहे. यापैकी काही शिक्षकांनी सातारा जिल्ह्यात स्वतःची आर्थिक गुंतवणूक व घर घेतले होते. आता त्यांना हे सर्व सोडून आपापल्या जिल्ह्यात पुन्हा एकदा नव्याने प्राथमिक शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम करावे लागणार आहे.

सातारा जिल्ह्यातील मातीने आम्हाला भरपूर दिलेला आहे. तसेच संस्कारही मिळालेले आहेत. त्यामुळे आयुष्यात सातारा जिल्ह्याबद्दल नेहमीच आदर असणार आहे. या कौटुंबिक सोहळयामध्ये आय.ए.एस. अधिकारी श्रीमती नागराजन यांच्या मनाच्या मोठेपणाची ही दर्शन घडले. बदली झालेले प्राथमिक शिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन यांची भेट घेऊन त्यांनी नियुक्तीचे आदेश दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले. त्या वेळेला शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्याचे योजले होते.

# महिन्याभरानंतर भारतात परतलेल्या प्रज्वलला विमानतळावरच अटक, व्हिडिओतील आवाजाचे नमुने गोळा करणार?

● नवी दिल्ली, प्रतिनिधी:

प्रज्वल रेवण्णाला बंगळुरूसेक्स टेप प्रकरणात जर्मनीत पळून गेलेल्या प्रज्वल रेवण्णाला अखेल पोलिसांनी अटक केली आहे. बंगुळूरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून त्याला कर्नाटक पोलिसांनी अटक केली. गुरुवारी दुपरी इंटरोपलकडून त्याच्या आगमनाची माहिती मिळाल्यानंतर कर्नाटक पोलिसांचे विशेष तपास पथक बंगळुरू पोलीस आणि इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी विमानतळवरच त्याला अटक करण्यासाठी रणनीती आखली होती. त्यानुसार, एसआयटीने त्याला ताब्यात घेतलं. त्याला तिथूनच थेट सीआयडी कार्यालयात नेण्यात आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

प्रज्ज्वल रेवण्णा हा एनडीएचा घटक पक्ष असलेल्या जेडीएसचा उमेदवार आहे. २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात त्याने मतदान केले होते. त्यानंतर त्याच्या कथित सेक्स व्हिडीओचा पेन ड्राईव्ह बाहेर काढण्यात आला. कर्नाटकमधील अनेक महिलांचे त्याने लैंगिक शोषण केले असल्याचे यावरून सांगितले गेले. प्रकरण देशभरात पसरल्यानंतर कर्नाटक सरकारने याच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केली. एसआयटीने सीबीआयमार्फत इंटरपोलला रेवण्णांचा ठावठिकाणा शोधण्याची विनंती केली होती. प्रज्ज्वल रेवण्णावर आतापर्यंत बलात्काराचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

प्रज्वल रेवण्णाच्या खटल्यांच्या तपास करणाऱ्या एसआयटीला गुरुवारी इंटरपोलकडून माहिती मिळाली की प्रज्वल म्युनिकहून लुफ्थान्साच्या फ्लाईटमध्ये



चढला. प्रज्वलला घेऊन जाणारे विमान शुक्रवार १२.४९ वाजता बंगळुरू येथे उतरले. इंटरपोलने कर्नाटक अधिकाऱ्यांना दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.०५ वाजता (भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३५) त्याने जर्मनीतून उड्डाण केलं.

प्रज्वलला प्रथम इमिग्रेशन अधिकारी ताब्यात घेतील. त्याच्या नावाविरोधात असलेल्या लुटआऊट नोटीस अंमलबजावणी केली जाईल. त्यानंतर त्याला स्थानिक पोलिसांकडे सोपवलं जाईल. मग एसआयटीकडून स्थानिक पोलीस त्याला ताब्यात घेतील, असं एसआयटीच्या अधिकाऱ्याने त्याच्या आगमनापूर्वी सांगितलं होतं. बंगळुरू पोलिसांनी यावेळी विमानतळावर अतिरिक्त सुरक्षा पुरवली आहे. एसआयटीने त्याच्या दोन बॅगा जप्त करून वेगळ्या कारमध्ये ठेवल्या.

त्याला अटक केल्यानंतर मध्यरात्री सीआयडी कार्यालयात नेण्यात आलं. आज त्याला कोर्टात सादर करण्यात येणार आहे. त्याआधी त्याची वैद्यकीय तपासणी केली जाण्याची शक्यता आहे.

### एसआयटीने दुय्यम पुरावेही तयार केले

■ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रज्वलविरुद्ध दाखल झालेल्या बलात्काराच्या तीन एफआयआरमधील प्राथमिक पुरावे हे तिन्ही पीडित महिलांचे जबाब आहेत. तर एसआयटीने दुय्यम पुरावेही तयार केले आहेत, ज्यात प्राणघातक हल्ला दर्शविणारे व्हिडिओ शूट करण्यात आले होते त्या ठिकाणांची पडताळणी करणे आणि शारीरिक गुणधर्मांचे विश्लेषण करणे आणि व्हिडिओमधील लोकांचा आवाज तपासला जाणार आहे. एसआयटी आरोपी आणि पीडितांच्या सेल फोन टॉवर लोकेशन माहितीसारख्या तांत्रिक डेटाचा वापर करत आहे. डझनभर साक्षीदारांचे जबाबही घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. बुधवारी एसआयटीने हसनमधील प्रज्वलच्या शासकीय निवासस्थानातून बेड, खाटा आणि फर्निचर जप्त केले. तसच, आता अटकेनंतर त्याच्या आवाजाचे नमुने आणि डीएनएसह इतर गुणधर्म गोळा केले जाण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात



### देवेंद्र फडणवीस रामललाचरणी नतमस्तक; रामदर्शनाने जीवन धन्य झाल्याची भावना व्यक्त

● अयोध्या, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांसाठीच्या प्रचारतोफा थंडावल्या. आता ०१ जून रोजी सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान झाल्यानंतर ०४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी कन्याकुमारी येथे ध्यानस्थ झाले असताना दुसरीकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अयोध्येला जाऊन रामललाचे दर्शन घेतले.

हे ते ठिकाण आहे जिथे श्री रामललाच्या पायांनी भूमी पवित्र झाली होती. कोट्यवधी लोकांची श्रद्धा असलेली ही जागा आहे. या भूमीत आल्यावर प्रत्येकाचे डोळे पाणावल्याशिवाय राहणार नाही. हे अयोध्या धाम आहे, जिथे माझे भगवान श्रीराम आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. एक्सवर पोस्ट करत देवेंद्र फडणवीस यांनी अयोध्या दौऱ्याची माहिती दिली आहे.

सर्वांच्या कल्याणासाठी प्रभू श्री रामलल्लास प्रार्थना केली

अयोध्या धाम येथील श्री रामजन्मभूमी मंदिरात श्री रामललाचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. ५०० वर्षांचा खडतर संघर्ष, अनेक पिढ्यांची प्रतीक्षा आणि त्यागानंतर उभारलेल्या या मंदिराची भव्यता आणि अलौकिकता अनुभवून आज मीही करोडो रामभक्तांप्रमाणे भावूक झालो. यावेळी सर्वांच्या कल्याणासाठी प्रभू श्री रामलल्लास प्रार्थना केली, अशी भावना देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

दरम्यान, अयोध्या दौऱ्यावर असताना देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर प्रदेशात स्थायिक झालेल्या मराठी जनतेशी संवाद साधला.

## सांगलीच्या जतमध्ये जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर; आचारसंहितेमुळे मार्ग मिळेना

● सांगली, प्रतिनिधी :

सांगलीतील जत तालुक्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यासोबतच जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे तालुक्यात चारा छावण्यांसह टँकरची संख्या वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. परंतु, असं जरी असलं तरीही आचारसंहितेमुळे मात्र राज्य सरकारला यावर तोडगा काढणं कठीण जात आहे. सरकारने राज्य निवडणूक आयोगाकडे आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी केली होती. मात्र ती आयोगाने फेटाळल्याने आता दुष्काळग्रस्त भागांना मदत जाहीर करणं सरकारला शक्य नाही. त्यामुळे आता यावर मार्ग निघत नसल्याचंच चित्र आहे.

जत तालुक्यात दुष्काळाची तीव्रता आणि दाहकता अधिकच वाढत चालली आहे. जत तालुक्यातील पूर्व भागातील ७३ गावांच्या



५३३ वाड्या-वस्त्यांवर ९७ टँकरनं सध्या माणसांना आणि जनावरांना पाणीपुरवठा केला जात आहे. पण चाऱ्याच्या तुटवड्यामुळे चारा छावणीची मागणी वाढू लागली आहे. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे चारा छावणी आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याच्या टँकरची संख्या वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर होत नसल्याचं जतचे आमदार विक्रमसिंह सावंत यांनी म्हटलं आहे. तर जत तालुक्यातील पूर्व भागांतील काही भागांत चारा छावणी किंवा चारा डेपो सुरू करण्याबाबत मागणी अर्ज आलेले आहेत.

## विवेकानंदांना जीवनाचा उद्देश सापडला, तिथेच मोदींची ध्यान साधना; ४५ तासांचे मौन व्रत अन् उपास!

● कन्याकुमारी, प्रतिनिधी :

यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झंझावाती प्रचार केल्याचे पाहायला मिळाले. लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्याच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट कन्याकुमारी गाठले आणि मौन व्रत तसेच ध्यानसाधनेचा संकल्प केला. ४५ तास नरेंद्र मोदी ध्यानसाधना आणि मौन व्रताचरण करणार आहेत.



भारतीय संस्कृती आणि परंपरा यांमध्ये ध्यानधारणा, मौन व्रत याला अनन्य साधारण महत्त्व आहे. ऋषी-मुनी तसेच संत-महंत मंडळी यांनी ध्यानधारणा, मौन व्रताचे केवळ आचरणच केले नाही, तर त्याचे महत्त्वही अधोरेखित केले आहे. ध्यान साधनेत मोठे बळ असते. ध्यानधारणा आणि मौन राहिल्यामुळे अनेक प्रश्नांची उकल आपलीच आपल्याला होऊ शकते. मन एके ठिकाणी शांत चित्त केले की, शांततेत विचार केला जाऊ शकतो. आत्मज्ञानाची प्राप्ती होऊ शकते, असे सांगितले जाते. गौतम बुद्धांनीही ध्यान साधना आणि मौन व्रताचरणातून अनेक गोष्टी साध्य केल्याचे सांगितले जाते. ध्यानाचे आणि मौन व्रताचे अनेक फायदे, लाभ सांगितले जातात.

कन्याकुमारी आणि स्वामी विवेकानंद

गुरु रामकृष्णांकडून संन्यास दीक्षा घेतल्यानंतर स्वामी विवेकानंदांनी भारतभ्रमण केले. देशातील परिस्थिती याची देही याची डोळा पाहिली. कन्याकुमारी या भारताच्या दक्षिण टोकाला जाऊन पोहोचले.

## जिन रिफ्लेक्सोलॉजी दिनानिमित्त उपक्रम: ४ राज्यात राबविणार 'स्वस्थ भारत अभियान'




● छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :

'आजारावर उपचार करण्यापेक्षा अधिक चांगले आहे की, आपण आजारीच पडू नाही', या उद्देशाने इंटरनॅशनल रिफ्लेक्सोलॉजी जिन असोसिएशनतर्फे 'जिन रिफ्लेक्सोलॉजी दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त १ ते २१ जूनदरम्यान देशातील ४ राज्यात 'स्वस्थ भारत अभियान' राबविण्यात येणार आहे. 'जिन रिफ्लेक्सोलॉजी दिन ते आंतरराष्ट्रीय योग दिवस' दरम्यान हे अभियान घेण्यात येणार आहे. २१ दिवसांत ४ राज्यांतील २० शहरांत २१ सेमिनारचे नियोजन करण्यात आले आहे. 'भविष्यात होणाऱ्या गंभीर आजारांना जिन रिफ्लेक्सोलॉजीद्वारे कसे टाळायचे, याची सविस्तर माहिती या अभियानात देण्यात येणार आहे. या अभियानाचा मीडिया पार्टनर 'लोकमत' आहे. हे अभियान यशस्वितेसाठी आंतरराष्ट्रीय रिफ्लेक्सोलॉजी जिन असोसिएशनसोबत विविध संस्था, संघटना परिश्रम घेत आहेत. सर्व सेमिनारसाठी मुख्य वक्ते जिन रिफ्लेक्सोलॉजीचे संशोधनकर्ता जि. रि. अनिल जैन उपस्थित राहणार आहेत.

## आयटी कंपन्यांच्या स्थलांतराला राज्यातील ट्रिपल इंजिन जबाबदार

### सुप्रिया सुळेंचा राज्य सरकारवर निशाणा

● पुणे, प्रतिनिधी :

अहिल्यादेवी होळकर यांच्याकडे आपण आदर्शमाता म्हणून बघतो. अगदी लहान वयात त्यांच्यावर एक प्रसंग घडला पण त्या खचल्या नाहीत. एक आदर्श जीवन त्या जगल्या आणि लढल्या, हार त्यांनी मानली नाही. राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर या आमच्या आदर्श माता आहेत. देशातील कर्तृत्ववान महिला म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, आज जयंतीनिमित्त आम्ही त्यांना विनम्रपणे अभिवादन करण्यासाठी येथे आलो आहोत असे, बारामतीच्या खासदार आणि लोकसभा २०२४ मधील उमेदवार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

पुण्यातील सारसबागे समोरील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया



सुळे यांनी पुष्पहार अर्पण करून अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी त्यांनी त्यांच्या पक्षातील युवा नेत्या सोनिया दुहान यांनी केलेल्या आरोपांवरही उत्तर दिले. त्यासोबतच हिंजवडी आयटी पार्कमधून स्थलांतरीत झालेल्या कंपन्यांसाठी राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला.

## छोटे दागिने वितळवून मोठा दागिना बनवणार; पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचा प्रस्ताव

● पंढरपूर, प्रतिनिधी :



येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेला भाविकांकडून अर्पण केलेले लहान-मोठे दागिने वितळवून मोठा दागिना तयार करण्याचा प्रस्ताव मंदिर समितीच्या वतीने सरकारच्या विधि व न्याय विभागाकडे पाठविण्यात आल्याची माहिती सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडे छोटे-छोटे दागिने मिळून जवळपास २८ किलो सोने अन् ९५० किलो चांदी जमा झाली आहे. वर्षाकाठी विठ्ठलाच्या दर्शनाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. अनेक भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेला छोटे-मोठे सोन्याचे व चांदीचे दागिने अर्पण करतात.

दागिने छोटे असल्यामुळे देवाला परिधान करता येत नाहीत. त्यामुळे त्याचा मोठा दागिना तयार करण्याची परवानगी मिळावी, यासाठी विधि व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मात्र, अद्याप मंजुरी मिळाली नाही, असेही औसेकर यांनी सांगितले. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन २ जूनपासून सुरू होणार आहे.

## मुख्यमंत्र्यांनी गावी शेतात थांबण्यापेक्षा राज्यातील दुष्काळाकडे लक्ष द्यावे : नाना पटोले

● सातारा, प्रतिनिधी :

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या त्यांच्या मूळगावी आले आहेत. मी शेतकरी असून सध्या शेतात असल्याचे ते ट्विट करत आहेत; पण आपण मुख्यमंत्री आहे हे त्यांनी ध्यानात घ्यावे. राज्यात सध्या तीव्र दुष्काळ आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्याकडेही त्यांनी लक्ष द्यावे. पुन्हा तुम्हाला शेतीच करायची आहे,' असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी लगावला.

कऱ्हाड दौऱ्यावर आलेले पटोले म्हणाले, ' आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्यानाची धास्ती नाही. पंतप्रधान म्हणून त्यांचे हे शेवटचे ध्यान आहे. फक्त सध्या आचारसंहिता असल्याने त्यांचे ध्यान माध्यमातून येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे. ते आचारसंहितेत बसत नाही अन् नरेंद्र मोदी म्हणून त्यांना पुढील काळात आता ध्यानच करत बसायचे आहे, असा चिमटाही त्यांनी काढला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो फाडले गेले याचे समर्थन कोणीही करणार नाही; पण मनुस्मृती अभ्यासात यावी, हा भाजपचा प्रयत्न आहे. त्याला काँग्रेस नेहमीच विरोध करेल. अभ्यासक्रमात मनुस्मृती आणून संविधान संपवण्याचा भाजपचा डाव आहे. तो कालबाह्य ग्रंथ आहे. त्याचा अभ्यासक्रमात समावेश होऊ देणार नाही. पोर्शे अपघातप्रकरणी त्या गाडीत कोण-कोण होते? हे पुढे का येत नाही. पोलिस प्रकरण का दाबत आहेत? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यावे. कारण आता दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर कोणाचा विश्वास राहिलेला नाही. राज्याच्या जनतेने कोणाकडे दाद मागावी, हा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणाचा दबाव आहे, हे सगळे समोर आले पाहिजे. श्रीमंतांना वेगळा कायदा आहे का? असा सवाल करत जनता भयभीत आहे म्हणून मुख्यमंत्री यांनी उत्तर द्यावे, असेही पटोले एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले.

### याचे उत्तर आव्हाडच देतील..

■ महाविकास आघाडीने संविधान वाचवा म्हणून प्रचार केला; पण त्याचा घटकपक्ष असलेल्या एका पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संविधानाच्या विरोधात कृती केली आहे. याबाबत छेडताच याचे उत्तर जितेंद्र आव्हाड देतील, असे पटोले म्हणाले.

## निवडणूक खर्चात सुनील तटकरेंचा नंबर पहिला

● अलिबाग, प्रतिनिधी :

रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान झाले. आणि ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान, निकाल लागल्यानंतर ३० दिवसांत निवडणुकीचा खर्च सादर करण्यासाठी मुदत निवडणूक आयोगाने दिली आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांना ४ जुलैपर्यंत खर्च सादर करण्याची मुदत दिली आहे. दरम्यान, 'आपलं महानगर'च्या हाती आलेल्या माहितीनुसार रायगड लोकसभा मतदारसंघात निवडणुकीत सर्वाधिक खर्च राष्ट्रवादी काँग्रेसचे महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांनी केला आहे. वाढत्या महागाईत सर्वच खर्च वाढले आहेत. यात निवडणूक खर्चाचाही अपवाद नाही. त्यामुळे निवडणूक खर्चाची



मर्यादा यावेळी आयोगाने २५ लाखांनी वाढवून ९५ लाख केली आहे. रायगड लोकसभा मतदारसंघासाठी प्रचारात महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांसह वंचित बहुजन आघाडी, तसेच अपक्ष उमेदवारांच्या वतीने सँडो रजिस्टरमध्ये खर्चाची नोंद केली आहे. मात्र अद्याप सर्व उमेदवारांकडून खर्चाची गोळाबेरीज निवडणूक विभागाला पूर्णपणे सादर झालेली नाही.

लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांना निवडणूक खर्च सादर करण्यापूर्वी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण होणार आहे. त्यासाठी रायगड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक धीरेंद्रमणी त्रिपाठी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर खर्च ताळमेळ बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. उमेदवारांकडून खर्चाचा तपशील मागवण्यात आला आहे आणि त्यासाठी ४ जुलैपर्यंत मुदत आहे. उमेदवारांनी खर्च सादर करण्यास टाळाटाळ केल्यास त्या उमेदवारावर कारवाई होऊ शकते, याकडे लक्ष वेधण्यात येते. रायगड लोकसभा मतदारसंघात १३ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे आणि महाआघाडीचे अनंत गीते यांच्यात मुख्य लढत होती.